रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक २९१ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, गुरुवार, दि. २८ मार्च २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹



# गद्दारांना गाडण्याचा शेकापचा निर्धार

## जनतेची फसवणूक करणाऱ्यांना घरी बसवा

### आ. जयंत पाटील यांचे आवाहन

प्रमोद जाधव
| अलिबाग |

देशात, राज्यात भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम केले जात आहे. वेगवेगळ्या शासकीय यंत्रणेचा वापर करीत दबाव टाकण्याचे काम केले जात आहे. दादागिरीसह जनतेची गळचेपी चालू आहे. सर्वसामान्यांना अडविण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे जनतेमध्ये तीव्र संताप आहे. लोकसभा निवडणूकीच्या मतमोजणीनंतर त्यांना त्यांची जागा कळणार आहे. त्या पध्दतीने आतापासूनच आपण सर्वांनी काम करायचे आहे. शेतकरी कामगार पक्षाने अनेकांना मोठे केले आहे, पण ते विसरले आहेत. त्यामुळे गद्दारांना या निवडणूकीत गाडण्याची वेळ आली असून ज्यांनी दगाबाजी केली आहे, त्यांना या निवडणुकीतून जागा दाखविण्याचे काम केले जाणार आहे. वेगळ्या उमेदीने कार्यकर्त्यांनी कामाला लागून कार्यकर्त्यांनी फसवेगिरी करणाऱ्यांना घरी बसविण्याचे आवाहन शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले. मुरुडमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा निर्धार मेळावा बुधवारी (दि. २७) हिंदू बोर्डींग मैदानात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी जयंत पाटील बोलत होते.

यावेळी शरद पवार गटाचे आ. रोहित पवार, माजी आ.अनिल तटकरे, माजी आ. पंडित पाटील, आ. सुनील भुसारा, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, रायग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, साधना पाटील, महाराष्ट्र राज्य मच्छीमार संघाचे अध्यक्ष विजय गिदी, निता गिदी, वामन चुनेकर, प्रमोद भायदे, माणिक चव्हाण, शरद चवरकर, पांडूरंग आगारकर, धर्मा हिरवे, अस्लम हळदे, कमळाकर माने, किर्ती शहा, पान २ वर

**खा. सुनील तटकरे यांना मोठे करण्याचे काम त्यांचे बंधू अनिल तटकरे यांनी केले. मात्र त्यांच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचे काम तटकरेंनी केले आहे. या सुनील तटकरे पुन्हा उभे राहणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करायची आहे. आपल्या अपमानाचा बदला घ्यायचा आहे. जे पक्ष सोडून गेले आहेत, त्यांची पर्वा न करता शेकापचा लाल बावटा घेऊन सर्वांनी वेगळ्या उमेदीने कामाला लागा. शेकाप कधीही संपणार नाही, असे आ. जयंत पाटील यांनी सांगितले.**

## प्रतिगामी शक्तींसोबत जाणाऱ्यांना नापास करा

### आमदार रोहित पवार यांचे प्रतिपादन




| रायगड | खास प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्याला छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार, निष्ठा, स्वाभिमान सोडून जे आज प्रतिगामी शक्तींसोबत गेले आहेत, त्यांना लोकसभेच्या निवडणुकीत नापास करा, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार यांनी केले.

बुधवारी मुरूड येथे शेकापच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. इंडिया आघाडीने रायगड लोकसभा मतदार संघामध्ये शिवसेनेचे अंनत गीते यांच्यासारखा स्वच्छ चारित्र्याचा उमेदवार दिला आहे, तर दुसरीकडे सिंचन घोटाळ्याच्या चिखलात सुनील तटकरे रुतले आहेत, असा घणाघात पवार यांनी केला. गीतेंनी आतापर्यंत मंत्रीपदे भूषवली आहेत. मात्र, त्यांनी त्या पदाचा कधीच दुरूपयोग केला नाही अथवा भ्रष्टाचार केला नाही.

सुनील तटकरे हे निवडून येण्यासाठी सर्वांच्याच पाया पडतील. त्यांना त्यांची जागा या निवडणुकीत दाखवा. एकदा का ते निवडून आले की ते मदत पान २ वर

**सुनील तटकरे यांनी या आधी काँग्रेसचे बॅ. ए. आर. अंतुले, शेकापचे जयंत पाटील, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना फसवले आहे. त्यांच्याकडे विचार, निष्ठा नाही. भविष्यात भाजपाच्या कमळामध्ये कोणी पहिली उडी मारेल, तर ते सुनील तटकरे असतील, असेही पवार यांनी स्पष्ट केले. हिरोजी इंदुलकरांनी रायगड किल्ला बांधताना स्वतःचे घर गहाण टाकले होते. मात्र तटकरे यांनी स्वतःच्या घरासाठी खोट्या १०० कंपन्या काढल्याचे टीकास्त्र पवार यांनी डागले.**

## लोकसभेसाठी 'मनसे'चे 'राज'कारण

| मुंबई | वृत्तसंस्था |

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मागच्या आठवड्यात दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यानंतर महायुतीत मनसे दाखल होणार अशा चर्चा रंगल्या होत्या. मात्र आता राज ठाकरे महायुतीत येणार हे स्पष्ट झाले आहे. मनसेने लोकसभेसाठी महायुतीकडे दोन जागांचा प्रस्ताव दिला आहे, अशी माहिती बाळा नांदगावकर यांनी दिली.

गुढीपाडव्यानिमित्त मंगळवारी (दि.९) मेळावा होणार आहे. त्याच्या तयारीसंदर्भात आम्ही राज ठाकरेंशी चर्चा केली. दरवर्षी गुढीपाडव्याला राज ठाकरे मेळावा घेतात. त्यासंदर्भात आम्ही चर्चा केली. बाकी ज्या राजकीय गोष्टी आहेत त्यासंदर्भात दोन ते चार दिवस थांबा तुम्हाला सगळ्या गोष्टी समोर येतील, असा सूचक इशारा पक्षप्रमुखांनी दिला असल्याचे नांदगावकर म्हणाले. एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसे एकत्र होण्याच्या चर्चा वृत्तपत्रात आणि वाहिन्यांवरच पाहिल्या आहेत. अशी काही चर्चा झाली असल्याची मला कल्पना नाही. जर तशी चर्चा झाली असेल तरीही त्याची माहिती ही राज ठाकरेच देऊ शकतील, असे बाळा नांदगावकर म्हणाले.

लोकसभा निवडणुकीसाठी राज ठाकरे आणि भाजपात जागा वाटपाबाबत चर्चा सुरु आहे. त्या जागा नेमक्या कुठल्या आहेत हे राज ठाकरे सांगू शकतील. योग्य तो निर्णय पक्षप्रमुख म्हणजेच राज ठाकरे घेतील, असे बाळा नांदगावकर यांनी स्पष्ट केले.

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तीन जागांचा प्रस्ताव महायुतीसमोर दिला होता. लोकसभा निवडणुकीला मनसे तीन जागा लढवण्यास इच्छुक असल्याचे राज ठाकरे यांनी महायुतीला सांगितले होते. त्यावर चर्चा सुरु होती. आता आम्ही महायुतीकडे दोन जागा मागितल्या आहेत, असे बाळा नांदगावकर यांनी सांगितले.**

## प्रकाश आंबेडकर आघाडीतून बाहेर?

| अकोला | वृत्तसंस्था |

लोकसभा निवडणूक तोंडावर आली असतानाही महाविकास आघाडीचे जागावाटप काही ठरत नव्हते. त्यातच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी पहिल्या टप्प्यासाठी आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांनी 'एकला चलो रे' चा नारा दिल्याचे दिसून येत आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी अकोला येथे पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, वंचित बहुजन आघाडीच्या राज्यसमितीची काल बैठक घेतली. या बैठकीत आगामी निवडणूक लढण्यासंदर्भात आम्ही काही निर्णय घेतले आहेत. आमच्याबरोबर जे आघाडी करण्यासाठी इच्छूक होते. त्यांना आम्ही सांगितले की, महाराष्ट्रातील जरांगे पाटील फॅक्टर लक्षात घ्यावा. पण तो फॅक्टर लक्षात घेतला गेला नाही. जरांगे पाटील यांच्यासह काल आमची बैठक झाली. पहिल्या टप्प्यातील अर्ज भरण्याची मुदत संपत आहे. पण दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यासाठी विचार विनिमय करून अर्ज करण्याचे आमचे ठरले आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी उमेदवारांची यादी जाहीर केली असली तरी महाविकास आघाडीतून ते बाहेर पडले आहेत का? याबाबत त्यांनी उत्तर देणे टाळले. आज फक्त उमेदवारांची घोषणा करत आहे. प्रश्नोत्तरांना नंतर उत्तर देईन, असेही त्यांनी यावेळी सांगितले. पान २ वर



**वंचित आघाडीने भलेही मनोज जरांगे यांच्यासोबत चर्चा केल्याचे सांगितलं असलं तरी त्यांच्यासोबत जाण्याबाबतच्या दाव्यावर मनोज जरांगे यांनी नकार दिला आहे. जरांगे म्हणाले की, प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत आमची चर्चा झाली. परंतु,आम्ही वंचितला पाठिंबा दिलेला नाही. आम्ही ३० मार्चपर्यंत राजकीय निर्णय जाहीर करणार आहोत.दरम्यान, काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे बोलावलेल्या बैठकीमध्ये अपक्ष उमेदवार उभे करण्याचा तात्पुरता निर्णय घेतला होता. १७ ते १८ मतदारसंघांमध्ये अपक्ष उमेदवार उभे करत; त्या उमेदवारांमध्ये मराठा, मुस्लिम, दलित, धनगर समाजाचे उमेदवार असतील, असे स्पष्ट केले होते.**

## अलिबाग-विरारसाठी एप्रिल महिन्यात ठरणार कंत्राटदार

| रायगड | खास प्रतिनिधी |

बहुप्रतिक्षित अलिबाग-विरार बहुउद्देशीय मार्गिकेच्या कामासाठी आठ कंत्राटदारांनी निविदा दाखल केल्या आहेत. येत्या काही दिवसांत या कामासाठी निविदा अंतिम केल्या जाणार आहेत. त्यानंतर पुढील काही महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे हा मार्ग रायगडकरांसाठी विकासाच्या नवीन वाटा निर्माण करणार ठरणार असल्याचे बोलले जाते.

निवडणूक रोख्यांमुळे चर्चेत आलेल्या मेघा इंजिनिअरिंग कंपनीसह, एल अँन्ड टी, अप्को, अफकॉन, पटेल इन्फ्रा, वेलस्पून इंटरप्रायजेस, मोन्टोकार्लो यासह अन्य एका कंपनीचा समावेश आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, या प्रकल्पाच्या आर्थिक निविदा एप्रिल महिन्यात खुल्या केल्या जाणार आहेत. पान २ वर



मार्गिकेच्या कामासाठी आठ कंत्राटदारांच्या निविदा

## निवडणुकीआधीच समाजमाध्यमांवर गीते विजयी!

| रायगड | खास प्रतिनिधी |

लोकसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सुनील तटकरे यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. इंडिया आघाडीने आधीच शिवसेना ठाकरे गटाचे अनंत गीते यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे या दोघांमध्येच खरी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. गीते निवडून येणार असा दावा करणारे संदेश आता समाजमाध्यमांवर झळकू लागले आहेत. त्यामुळे निवडणूक ७ मे रोजी आणि निकाल मात्र समाजमाध्यमांवर आजच लागल्याचे चित्र त्या निमित्ताने दिसून येत आहे.

सध्या कमी कालावधीत नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे माध्यम म्हणजे समाजमाध्यम होय. आपापल्या भावना, विचार थेटपणे मांडण्याचे एक उत्तम आणि प्रभावी व्यासपीठ आहे. प्रामुख्याने व्हॉटस् ॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम यासह अन्य माध्यमांचा त्यामध्ये समावेश होता.

रायगड लोसकसभा मतदार संघामध्ये शिवसेनेचे अनंत गीते विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांच्यामध्ये सरळ लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. समाजमाध्यमांवर या दोन्ही नेत्यांचे फोटो झळकत असून यांच्यामध्ये काटे की टक्कर होणार असे संदेश व्हायरल होत आहेत. इंडिया आघाडीचे अनंत गीते हे तटकरेंचा पराभव करतील आणि निवडून येतील, असा संदेश समाजवादी पक्षाचे अलिबाग तालुकाध्यक्ष अशरफ घट्टे यांनी टाकला आहे. मात्र, मुस्लिम समाजाची मते त्यांना मिळतील असे शिवराज्य ब्रिगेड महाराष्ट्राचे अध्यक्ष शैलेश चव्हाण यांनी म्हटले आहे. परंतु,हा मुद्दा खोडून काढत, मुस्लिम समाजाची मते तटकरे यांना मिळणार नाहीत, असे घट्टे यांनी स्पष्ट केले आहे.

चव्हाण आणि घट्टे यांची तटकरे यांनी फसवणूक केली असल्याचे संदेशही त्यामध्ये दिसून येतात. आता खरी वेळ आली आहे, आपली ताकद दाखवण्याची असे घट्टे यांनी पुढे म्हटले आहे. काळ काय ठरवेल माहीत नाही.. पण वेळ मात्र नक्की आली आहे. पान २ वर



- **तटकरेंना मुस्लिम मते मिळणार नसल्याचा दावा**
- **राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये व्हॉटस् ॲप युद्ध**

## धैर्यशिल पाटलांच्या हाती तुतारी!

| माढा | वृत्तसंस्था |

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात डाव टाकला आहे. अकलूजचे मोहिते-पाटील लवकरच शरद पवार यांच्या राष्ट्रावादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे बंधू जयसिंह मोहिते-पाटील यांनी याबाबतची माहिती दिली आहे. विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील आणि धैर्यशील मोहिते-पाटील यांची गुरुवारी शरद पवार यांच्यासोबत मुंबईत बैठक होणार आहे. त्यामुळे धैर्यशील मोहिते पाटील यांना प्रवेश

## आजचा अग्रलेख

**'वंचित'चा वेगळा मार्ग**

## वेधक

### सद्गुरू जग्गी यांना मिळाला डिस्चार्ज

**नवी दिल्ली:** आध्यात्मिक गुरु आणि ईशा फाऊंडेशनचे प्रमुख सद्गुरु जग्गी वासूदेव यांच्यावर काही दिवसांपूर्वी दिल्लीच्या अपोलो रुग्णालयात मेंदूवरील तातडीची शस्त्रक्रिया पार पडली होती. त्यानंतर आज दहा दिवसांनी त्यांची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. काही दिवसांपासून डोकेदुखीचा तीव्र त्रास होत असल्यानं १७ मार्च रोजी सद्गुरुंना अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. या ठिकाणी त्यांच्या मेंदूवर शस्त्रक्रिया पार पडली. त्यानंतर आज दहा दिवसांनंतर त्यांची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.

### सदाभाऊंनी शेट्टींच्या विरोधात ठोकला शड्डू

**इस्लामपूर :** हातकणंगले मतदार संघात प्रस्थापितांना प्राधान्य दिले जात आहे. ही जागा आम्हालाच पाहिजे, आम्ही प्रस्थापित नेत्यांचा प्रचार करणार नाही. २०१९ पासून आम्ही ही जागा रयत क्रांती संघटनेला मागत आहोत. मात्र येथे प्रस्थापितांनाच प्राधान्य दिले जात असल्याने आमच्यासारखे विस्थापित दुर्लक्षीतच रहात आहेत. ही जागा रयत क्रांती संघटना लढवणार आहे.त्यासाठी देवेंद्र फडणवीस यांची गुरुवारी (दि.२८) भेट घेणार असल्याची माहिती माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी दिली.

### केजरीवाल यांची प्रकृती खालावली

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने कारवाई करत अटक केली आहे. कोर्टाने केजरीवालांना ईडी कोठडी सुनावली असून ते जेलमधूनच सरकारचं कामकाज बघत आहेत. दरम्यान, केजरीवालांची प्रकृती बघिडल्याची माहिती समोर येत आहे. सूत्रांनी सांगितलं की, ईडी कोठडीमध्ये असलेल्या केजरीवाल यांची शुगर लेव्हल लो झाली आहे. मागच्या काही तासांपासून शुगर खाली-वर येत असल्याची माहिती आहे.

### एमएमआरडीए कार्यालयात नोंदविल्या विरोधात हरकती

## तिसऱ्या मुंबईला हजारो शेतकऱ्यांचा आक्षेप

| उरण | वार्ताहर |

अटल सेतू मुंबई ट्रान्स-हार्बर लिंकभोवती 'तिसरी मुंबई' विकसित करण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाला १२४ गावांतील ग्रामस्थांनी विरोध करण्यासाठी बुधवारी (दि.२७) सीबीडी, बेलापुर येथील एमएमआरडीएच्या कार्यालयात सामुहिकरित्या हरकती नोंदविल्या.

भांडवलदारांच्या फायद्यासाठी सरकार समाजाला भूमिहीन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करून ग्रामस्थांनी आपले आक्षेप नोंदविले आहेत. यावेळी ग्रामस्थांनी शासनाकडे अनेक मागण्या मांडल्या आहेत. हरकती नोंदवण्यासाठी गावोगावी जनजागृती बैठका घेण्यात येऊन ग्रामपंचायतींनी योजनेच्या विरोधात ठराव करून ते शासनाला दिले आहेत.

राज्य सरकारने ४ मार्च रोजी एम टीएचएलच्या आजूबाजूची १२४ गावे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षतेखालील न्यू टाऊन डेव्हलपमेंट ॲथॉरिटीकडे सोपवण्याची अधिसूचना जारी केली. उरण, पनवेल, पेण परिसरात ही गावे आहेत. तिसऱ्या मुंबईने नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रात ८० गावे, खोपटा न्यू टाऊ न अधिसूचित क्षेत्रातील ३३, मुंबई महानगर प्रदेश आराखड्यातील दोन आणि रायगड प्रादेशिक योजनेतून नऊ गावांचा समावेश करण्याचा प्रस्ताव आहे. सरकारने आपल्या अधिसूचनेनंतर ३० दिवसांच्या आत सूचना आणि हरकती मागवल्या होत्या. या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी स्थानिक शेतकरी, गावातील नेते, राजकारणी आणि कार्यकर्त्यांनी एमएम आरडीए विरोधी शेतकरी समितीची स्थापना करून या प्रकल्पाविरोधात लढाई पान २ वर



- **१२४ गावातील ग्रामस्थांनी शासनाकडे नोंदविला विरोध**
- **प्रकल्पाविरोधात लढाई उभारण्याचा केला निर्धार**

## पंकजा मुंडे यांचा ताफा रोखण्याचा प्रयत्न

| केज | वृत्तसंस्था |

औरंगपूर येथील संत तुकोबाराय पावनधाम येथे सुरू असलेल्या बीज उत्स्वानिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह सांगता सोहळ्याच्या काल्याच्या किर्तनाला बुधवार (ता.२७) रोजी दुपारी उपस्थित राहण्यासाठी पंकजा मुंडे गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या वाहनाचा ताफा दाखल होताच काही तरूणांनी 'एक मराठा, लाख मराठा' च्या घोषणा देत पंकजा मुंडे यांचे वाहन अडविण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा मराठा आंदोलकांच्या रोषाला सामोरे जावे लागल्याने पंकजा मुंडे यांना तेथून काढता पाय घ्यावा लागला.

यावेळी पोलिसांनी जमाव पांगविण्यासाठी लाठीहल्ला केला. पोलिसांनी काही तरूणांना गावातून सकाळीच ताब्यात घेत पोलीस वाहनातून युसुफवडगाव पोलीस ठाण्यात नेल्याने मराठा आंदोलक आक्रमक झाले होते.

संत तुकोबाराय पावनधाम येथील धार्मिक स्थळाच्या दर्शनासाठी पंकजा मुंडे यांच्या येण्याला विरोध नव्हता. मात्र निवडणुकीची आदर्श आचारसंहिता पान २ वर

- **आंदोलनाला पांगविण्यासाठी पोलिसांचा लाठीहल्ला**
- **मराठा आंदोलक झाले आक्रमक**

# पेण तालुक्याला पाणी टंचाईच्या झळा

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यात खासकरून खारेपाटात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी योजनेसाठी गेली तीन-चार वर्ष कोट्यवधी रुपये आले. ती योजना योग्य वेळी पूर्ण न झाल्याने पेण पंचायत समितीला खारेपाटासह तालुक्याची तहान भागविण्यासाठी २ कोटी १५ लाख रूपयांचा आराखडा तयार करावा लागला. यामध्ये खारेपाटासह तालुक्यातील ५४ गावांसह १८९ वाडयांसाठी फक्त ४ टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे. ज्या ठिकाणी १६ टँकरची आवश्यकता आहे.



त्याठिकाणी ४ टँकर पाणी पुरवठा करत आहेत. एकीकडे मुबलक पाणीसाठा असूनदेखील वितरण व्यवस्थेच्या कुचकामी नियोजनामुळे तालुक्याला पाणी टंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत.

पेण तालुक्यातील सरेभाग, मसद, शिर्कीचाळ नंबर १ यामधील खारेपाट विभागातील वाशी, वढाव, भाल, काळेश्री, विठ्ठलवाडी, बोर्झे लाखोले, बहिराम कोटक, तामशीबंदर, तुकाराम वाडी, कान्होबा या गावांसह बळवली ग्रामपंचायत हद्दीतील दर्गावाडी निगडावाडी, भेंडीवाडी येथील अनेक वाड्या-वस्त्यांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी पेण पंचायत समितीने शासनाकडे ७ टँकरची मागणी केली होती. मात्र ६ टँकर उपलब्ध झाले असून यातील फक्त ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. यामध्ये २ टँकरची परवानगी अजून आली नसल्याने खारेपाटातील ५४ गावांसह १८९ वाडया वस्त्यांना मुबलक पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण होत आहे.

> **पेण खारेपाट भागातील पाणीटंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाकडे आराखड्यानुसार टँकरची मागणी करण्यात आली होती. मात्र यावेळी सहा टँकर उपलब्ध झाले आहेत. त्यातील पाच टँकर सुरू असून एक टँकर नादुरूस्त आहे तर इतर अजून सहा टँकरची परवानगी मागितली आहे. प्रातांकडे प्रस्ताव पाठवला आहे. तो प्रस्ताव लवकरच मिळेल. एकूण १२ टँकरची गरज आहे. त्यामध्ये वाक्रुळ ग्रामपंचायतीतील खरबाचीवाडी, नाईकवाडी, डांगरवाडी या वाड्यांनीदेखील टँकरचा प्रस्ताव पंचायत समितीकडे मांडला आहे त्याचीही पूर्तता होईल तेव्हा एक टँकर जास्तीचा मागवावा लागणार आहे. आताच्या घडीला ५ टँकरनी पाणी पुरवठा करत आहोत. यावर्षीच दोन कोटी पंधरा लाखांचा आराखडा तयार असून त्यानुसार वाशी सरेभागासह बळवली हद्दीतील दर्गावाडी व इतर वाड्यांवर टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे.**
>
> **भाऊसाहेब पोळ,गटविकास अधिकारी पेण**

पान १ वरून

## अलिबाग-विरारसाठी एप्रिल महिन्यात ठरणार कंत्राटदार

त्यानंतर कंत्राटदार नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (एमएसआरडीसी) अलिबाग-विरार दरम्यान १२८ किलोमीटर लांबीचा बहुउद्देशीय वाहतुकीचा मार्ग निर्माण करण्यात येणार आहे. मुंबई महानगरातील प्रवेश नियंत्रित असा हा पहिलाच महामार्ग असणार आहे. या मार्गामधोमध १३६ कि.मी. लांबीची मेट्रो मार्गिका उभारण्याचेही प्रस्तावित आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात वसई येथील राष्ट्रीय महामार्ग ८ वरील नवघर ते पेण तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील बलवली गावादरम्यान ९६ किलोमीटर लांबीचा महामार्ग उभारला जाईल. या महामार्गासाठी यासाठी सुमारे ६० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये भूसंपादनाच्या सुमारे २२ हजार कोटी रुपयांच्या खर्चाचा समावेश आहे.

## तिसऱ्या मुंबईला हजारो शेतकऱ्यांचा आक्षेप

उभारण्याची तयारी केली आहे.

एमएमआरडीए भूसंपादन विरोधी शेतकरी समिती उरणच्या वतीने आज कोकण भुवन आयुक्तालय सीबीडी बेलापूर येथे एमएमआरडीए विरोधात माजी आमदार तथा रायगड शिवसेना प्रमुख मनोहर भोईर यांच्या उपस्थितीत एमएमआरडीएचे सहसंचालक जितेंद्र भोपळे यांच्याकडे हरकती सादर केल्या. यावेळी तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, सुधाकर पाटील, बी.एन.डाकी, कैलास म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा पाटील, माजी जि.प. सदस्य जीवन गावंड, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष तथा माजी जि.प. सदस्य विनोद म्हात्रे, खोपटे सरपंच विशाखा ठाकूर, गोवठणे सरपंच प्रणिती म्हात्रे, वशेणी सरपंच अनामिका म्हात्रे, सरपंच कलावती पाटील यांच्यासह एमएमआरडीए भूसंपादन विरोधी शेतकरी समितीचे सदस्य आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रकाश आंबेडकर आघाडीतून बाहेर?

भाजपाने मुस्लिमांना बाजूला टाकण्याचे राजकारण सुरू केले आहे. त्यासाठी मुस्लीम समाजाला उमेदवारी देण्याचे आम्ही ठरविले. तसेच जैन समाजालाही उमेदवारी देऊन त्यांना जिंकून आणण्याचा आम्ही निर्धार केला आहे. मराठा, मुस्लिम आणि गरीब ओबीसी यांची सांगड घालून आम्ही नवी वाटचाल करत आहोत, असेही आंबेडकर म्हणाले.

राजकारणात हल्ली प्रचंड पैसा खर्च केला जातो. त्यामुळे निवडून गेलेला नेता जनतेशी बांधिलकी न ठेवता त्याला देणगी देणाऱ्यांशी बांधिलकी ठेवतो. त्यामुळे आम्ही सामान्य जनतेला आवाहन करत आहोत की, गावागावातून लोकांनी पुढे येऊन प्रचार करावा, असे आवाहन आंबेडकर यांनी केले.

प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, ओबीसी बहुजन पक्ष हा ओबीसांचा नवा पक्ष स्थापन झाला आहे. या पक्षाकडून सांगली येथे प्रकाश शेंडगे निवडणूक लढविणार आहेत. ते लढले तर आम्ही त्याला पाठिंबा देऊ. तसेच रामटेक मतदारसंघातील उमेदवाराचे नाव जाहीर केले जाईल. नागपूर मतदारसंघासाठी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देण्यात आला आहे.

## निवडणुकीआधीच समाजमाध्यमांवर गीते विजयी!

ठरवायची.......मतदार म्हणतात राजकारणात सगळच बदललय तर आता.....बदला, असे आवाहन शेकापच्या माजी नगरसेविका मानसी म्हात्रे यांनी यामध्ये केले आहे.

राजकीय रणांगण तापायला आता कोठे सुरुवात झाली आहे. अद्याप बऱ्याच सभा, बैठका होणार आहेत. दोन्ही बाजूने प्रचारांच्या तोफा धडाडणार आहेत. त्याचप्रमाणे समाज माध्यमांवर देखील विविध कमेंट्स्, मिम्स, विविध पोस्ट झळकणार आहेत. त्यामुळे भविष्यात समाजमाध्यमांवरील युध्द चांगलेच भडकणार असल्याचे दिसून येते.

## मोहिते-पाटलांच्या हाती तुतारी

देवून त्यांची माढा लोकसभेची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.

धैर्यशील मोहिते पाटील हे तुतारी चिन्ह घेऊन माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोहिते-पाटील शरद पवार गटात गेल्यास पश्चिम महाराष्ट्रात भाजपला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जातेय.

दरम्यान, जयसिंह मोहिते पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील भाजपमध्येच राहणार आहेत. बाकी सर्व मोहिते पाटील परिवार पुन्हा शरद पवार यांच्याकडे परत जाणार असल्याचे जयसिंह मोहिते पाटील म्हणाले.

## पंकजा मुंडे यांचा ताफा रोखण्याचा प्रयत्न

असल्याने किर्तनस्थळी येऊन व्यासपीठावर उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमात सत्कार स्वीकारण्यास विरोध होता. त्यामुळे पोलीसांनी सकाळीच कडक बंदोबस्त तैनात करून काही मराठा तरूणांना ताब्यात घेतले होते.त्यामुळे मराठा समाजाने एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत आपला रोष व्यक्त केला होता. परंतू लाठीहल्ला झाल्यानंतर व पंकजा मुंडे यांच्या ताफ्यातील वाहनांना वाट काढून देऊन रवाना झाल्यानंतर सकाळी ताब्यात घेतलेल्या तरूणांना दुपारी नोटीस बजावून सोडून देण्यात आले आहे.

औरंगपूर येथील श्रीक्षेत्र तुकोबाराय पावनधाम येथे पोलीसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या घटनेत वीस-पंचवीस जण जखमी झाले आहेत. त्यातील चार -पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. यावेळी लाठीचार्ज करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी केज तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरिक्षक मच्छिंद्र शेंडगे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

## जनतेची फसवणूक करणाऱ्यांना घरी बसवा

दादा कमाने, मनिष माळी, मुसरत उल्डे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक, शैला पाटील, अलिबागचे माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, वृषाली ठोसर, संजना किर, संदीप घरत, अस्लम राऊत, ॲड. गौतम पाटील, सवाई पाटील, नवशाद दळवी, सतिश लोंढे, गिरीश जोशी, हाफिज कबले आदी मान्यवर, शेकापसह इंडिया आघाडीचे पदाधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीचे आजी माजी पदाधिकारी, सभासद, व कार्यर्ते व महिला उपस्थित होते.

याप्रसंगी आ. जयंत पाटील म्हणाले, कृष्णा गिदीसह मोतीराम पाटील यांचा मुरुडमध्ये शेतकरी कामगार पक्ष वाढविण्यामध्ये सिंहाचा वाटा राहिला आहे. त्यांची आठवण कायमच स्मरणात राहणारी आहे. मुरुड तालुक्यात शेकापचे साम्राज्य निर्माण करण्यामध्ये या ज्येष्ठांसह अनेक कार्यकर्त्यांचे योगदान राहिले आहे.

शेतकरी कामगार पक्ष दिलेला शब्द पाळतो. वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये अनेकांवर विश्वास ठेवून त्यांना शेतकरी कामगार पक्षाने जिंकून आणले आहे. त्याच पक्षाला संपविण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या मार्गाने केला जात आहे. मात्र शेतकरी कामगार पक्ष हा संघर्षातून निर्माण झालेला पक्ष आहे. एकनिष्ठ व स्वाभीमानी पक्ष आहे. गरीबांची बांधिलकी असणारा पक्ष आहे. याची जाणीव विरोधकांनी कायम ठेवली पाहिजे. शेतकरी कामगार पक्ष कधीही न संपणारा पक्ष आहे. जे पक्ष सोडून गेले आहेत, त्यांची पर्वा न करता शेकापचा लाल बावटा घेऊन सर्वांनी वेगळ्या उमेदीने कामाला लागा. शेतकरी कामगार पक्ष कधीही संपणार नाही, असे आ. जयंत पाटील यांनी सांगितले.

पार्कसाठी स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेतले पाहिजे, असेही पवार यांनी सांगितले.

शेकापमधून काही लोक सोडून गेलेत म्हणून हतबल होऊ नका, आमच्यातील लोकांनी पक्ष चोरुन नेला आहे. त्यामुळे आम्ही खचलो नाही. तुम्ही देखील नव्या उमेदीने जयंत पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा, असे आवाहन पवार यांनी केले.

दिल्ली अथवा राज्यातील सत्तेत असताना शरद पवारांनी नेहमीच महिला, शेतकरी, कष्टकरी, युवा, बेरोजगार, शेती उद्योग यांना प्राधान्य दिले आहे. यासाठी त्यांनी राज्यात नेत्यांची फळी निर्माण केली होती. त्यातील काहीजण सोडून गेल्याने काही फरक पडत नाही. कारण गेलेल्यांकडे निष्ठा, विचार नाही. त्यामुळे विजय आपलाच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकरी कामगार पक्ष सत्तेत कमी आणि विरोधात अधिक वेळा राहिला आहे. मात्र, त्यांनी विचार आणि निष्ठा कधीच सोडली नाही. ते नेहमीच महिला, कष्टकरी, कामगार, शेतकरी, दलित, अल्पसंख्याक यांच्यासाठी लढत राहिले. २०१६ साली मराठवाड्यात दुष्काळ पडला होता. त्यावेळी जयंत पाटील हे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढण्यासाठी तेथे गेले होते. त्यांनी त्या ठिकाणी भव्य मोर्चा काढून सरकार आणि प्रशासनाला जागे करण्याचे काम केले होते. ही खरी निष्ठेची आणि विचारांची ताकद आहे. आमच्या घराण्यावर देखील शेकापचेच संस्कार झाले असल्याचेही त्यांनी सांगितले.

## प्रतिगामी शक्तींसोबत जाणाऱ्यांना नापास करा

करणाऱ्यांना हमखास विसरतात, असेही पवार म्हणाले.

देशात आणि राज्यात इंडिया आघाडीसाठी अत्यंत चांगले वातावरण निर्माण झाले आहे. भाजपाला सत्तेतून खाली खेचण्यासाठी इंडिया आघाडीची लाट येणार असल्याकडेही पवार यांनी लक्ष वेधले. भाजपाने राज्याची आणि मुंबईची ताकद कमी करण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. आएफसी सेंटर, हिरे व्यापार यासह अन्य प्रकल्प गुजरातला नेले आहेत. रायगडात येऊ घातलेल्या बल्क ड्रग्ज

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000030880**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-21/2024 - 2025.**<br>RFx E-tender for Providing of service for housekeeping, cleaning, sweeping and Garden Maintenance work at various Substation and offices under EHV (O&M) Division, Division Office Panvel for FY 2024-25...2nd call.<br>**Tender amount Rs. 23,40,817/-, EMD amount Rs. 23,408/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.03.2024, 18:00 Hrs. to 03.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. सिमा नरेश अहिर यांनी खालील वर्णन केलेली गाळा मिळकत तिचे मालक सौ. ताराबाई राजाराम राऊत यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. २१७ अ, २१८/१ अ या मिळकती वरील ''शिवगंगा अपार्टमेंट'' या इमारतीमधील तळ मजल्यावरील गाळा नं. ०६, क्षेत्र ३३६ चौ. फुट. बिल्टअप ही गाळा मिळकत. (ग्रामपंचायत नेरळ मिळकत क्र. २५४९/६)**

तरी वर वर्णन केलेल्या गाळा मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर गाळा मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २८/०३/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९३२५०६००३७

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज. म. र अर्ज २२/२०२४

**जाहिर नोटीस**

अब्दुल करीम इब्राहीम कडू,
रा. मु. सायगाव, पो. शिघ्रे, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत वावडूंगी, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार अब्दुल करीम इब्राहीम कडू, यांचा जन्म दिनांक १७/११/१९५२, रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे सायगाव, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत वावडूंगी कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार अब्दुल करीम इब्राहीम कडू, यांचा दिनांक १७/११/१९५२, रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. १४/०५/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज २२/०३/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज. म. र अर्ज २४/२०२४

**जाहीर नोटीस**

अब्दुल करीम इब्राहीम कडू,
रा. मु. सायगाव, पो. शिघ्रे, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत वावडूंगी, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांची मुलगी रफत अब्दुल करीम कडू यांचा जन्म दिनांक ०२/०६/१९८६, रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे सायगाव, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत वावडूंगी कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांची मुलगी रफत अब्दुल करीम कडू, यांचा दिनांक ०२/०६/१९८६, रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. १४/०५/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज २२/०३/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज. म. र अर्ज १७/२०२४

**जाहिर नोटीस**

तौफिका म. साजिद उलडे
रा. मु. पो. विहूर, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार तौफिका बेगम म सईद चिपळूनकर, हिचा जन्म दिनांक १९/०६/१९६६, रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे मजगाव, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगाव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार तौफिका बेगम म सईद चिपळूनकर, हिचा दिनांक १९/०६/१९६६, रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. १४/०५/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज २२/०३/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज. म. र अर्ज १८/२०२४

**जाहीर नोटीस**

मोहमद साजिद म. शफी उल्डे
रा. मु. पो. विहूर, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार मोहमद साजिद म शफी उल्डे, हिचा जन्म दिनांक २०/०६/१९६२ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे विहूर, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार मोहमद साजिद म शफी उल्डे, हिचा दिनांक २०/०६/१९६२, रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. १४/०५/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजून अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज २२/०३/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकती व त्यामधील ग्रामपंचायत वेश्वी मालमत्ता क्र.३०० क्षेत्र १८१८ चौ. फुट (इतर पक्के बांधकाम दुमजली) सह सदरहू मिळकतींचे विद्यमान मालक श्रीमती कल्पना विष्णू पाटील व श्री. विष्णू पांडुरंग पाटील, रा. गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याबाबत ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि.रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकारणी (रू.पै) |
|---|---|---|---|
| १. | गावठाण/१० | ३.००.०० | ३०.०० |
| २. | गावठाण/३० | ०.८०.०० | ८०.०० |

तरी वर नमूद बिनशेती गावठाण मिळकती आणि त्यामधील वेश्वी ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३०० या घर मिळकतीवर मिळकतींचे विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाही इसमाचा संस्थांचा साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, वारसाहक्क, पोटगी, दान, गहाण, तारण, बोजा, भाडेपट्टा, आदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरच्या मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असून त्यांचे टायटल मार्केटेबल व क्लिअर आहे असे समजून आमचे अशिल मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतींच्या खरेदीविक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच अशा प्रकारचा कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, तो त्यांनी जाणीवपूर्वक आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची याद्वारे सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. २८/०३/२०२४

सही/-
**ॲड. शिरीष पद्माकर लेले**
'श्रीकृपा',भाऊ साहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

दि. २७/०३/२०२४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक मिनल प्रशांत टिबे यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| ताडवागळे ता. अलिबाग | ३० | ०-०५-०० पो. ख. ०-००-०० एकूण क्षेत्र ०-०५-०० | ०.०८ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड. अतुल उल्हास तुरकर**
रा. भगवती, पो. चौल,
ता. अलिबाग, जि. रायगड, ४०२२०३,
मोबाईल नं. ९११९५९८८६४

### जाहीर नोटीस

**ॲड. शिरीष प. लेले**
निशाणी क्र.

**अलिबाग येथील मे. सि. ज. ज्यु. डी. साो. यांचे कोर्टात**

रे. मु. नं. ४६/१९९४

गोविंद चंदर वाकडे (मयत) तर्फे वारस, वगैरे ...वादी

**विरूध्द**

केशव जानू वाकडे, वगैरे ...प्र. वादी

प्रति,
प्र.वादी नं
१६/४) श्रीमती संगीता प्रकाश पाटील (मुलगी)
रा. बेली, ता अलिबाग, जि. रायगड.

ज्याअर्थी वादी गोविंद चंदर वाकडे (मयत) तर्फे वारस यांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात रे. मु. नं. ४६/१९९४ दाखल केले आहे.

सदर कामातील प्र.वादी नं १६ चे वारसांना दिलेल्या पत्त्यावर नोटीस काढली असता प्र.वादी नं १६/४ ची नोटीस न बजावता परत आली आहे. प्र.वादी नं. १६/४ चा दाव्यात दिलेला हा पत्ता वादी यांना माहित असलेला शेवटचा पत्ता आहे. वादीच्या माहितीप्रमाणे वरील नमुद पत्ता हा योग्य व बरोबर असून प्र.वादी त्याच पत्त्यावर राहत असूनही नोटीसीची बजावणी करून घेण्यास जाणिवपुर्वक टाळाटाळ करीत आहेत असे निष्पन्न झाले आहे. तसेच वादीच्या माहितीप्रमाणे हा तुमचा शेवटचा माहीत असलेला पत्ता आहे. त्यामुळे तुम्हास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की,

सदर रे. मु. नं. ४६/१९९४ या कामाची पुढील ता. २/४/२०२४ अशी नेमण्यांत आली आहे. त्या दिवशी तुम्ही स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत ठिक स. १०:०० वा कोर्टात हजर राहून सदर दाव्याचेकामी तुमचा बचाव सादर करावा. उक्त दिनी तुम्ही स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होवून तुमचा बचाव सादर न केल्यास सदर दाव्याचे कामी तुमच्या विरुध्द एकतर्फी हुकूम पारित करण्यात येईल व सदर दाव्याचेकामी पुढील हुकूम मे कोर्टामार्फत करण्यात येईल हे तुम्हांस कळावे.

सदरची नोटीस आज दि. २७/०३/२०२४ रोजी माझ्या सहीने कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/-
लिपिक
जिल्हा न्यायाधिश
अलिबाग-रायगड

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक
जिल्हा न्यायाधिश
अलिबाग-रायगड

## मेळाव्यात हजारोंची उपस्थिती अन् तरुणांचा जल्लोष





● (छायाचित्र : समीर मालोदे)







# मुरुडमध्ये भाजप, शिंदे गटाला भगदाड; कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुरुडमध्ये भाजप, शिंदे गट शिवसेनेच्या मनमानी कारभाराला कंटाळून मोरे, मिठागर, वाघोबावाडी, नांदगाव येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केलो. त्यामुळे भाजप व शिंदे गटात मुरुडमध्ये भगदाड पडले असल्याचे चित्र दिसून आले आहे. भाजपचे युवा मोर्चा उपाध्यक्ष गणेश दिवेकर, भाजप मुरूड तालुका आयटी सेलचे संदीप चिरायू,मुरुड तालुक्यातील मोरे गावातील हरिश्‍चंद्र दिवेकर, सुबोध बामुगडे, गणेश मस्या दिवेकर, हेमंत दिवेकर, अजेय घोसाळकर, भाजपचे मुरुड तालुका किसान मोर्चा अध्यक्ष महेश ठाकूर, नरेंद्र शहापूरकर, निलेश ठाकूर, अनीश बैकर, गणपत बैकर, अमित शापूरकर, निकम माळी, शिवसेनेचे सुरेश मालवणकर, आदी अनेक नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या हस्ते जल्लोषात स्वागत करण्यात आले.

### जनतेच्या हितासाठी एकत्र या : आ. सुनील भुसारा यांचे आवाहन



शेतकरी, कष्टकर्‍यांसह सर्वसामान्यांच्या हितासाठी शेतकरी कामगार पक्ष काम करीत आहे. पक्षाशी एकनिष्ठ राहून आ. जयंत पाटील, पंडित पाटील, अ‍ॅड.आस्वाद पाटील, चित्रा पाटील, चित्रलेखा पाटील काम करीत आहेत.सत्ताधारी पक्षातील काहीजण ५० खोके एकदम ओके या भावनेतून पक्ष बदलून गेले. त्यांनी नवीन टोळी निर्माण करून विकासावर डल्ला मारण्याचे काम केले. विकासाच्या नावाने भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीच्या आमदारांना ५०० कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यता दिल्या. मात्र यामध्ये फक्त तीनच कोटी रुपयांची कामे करण्याची तरतूद आहे. लोकांना फसविण्यासाठी आणि स्वतःचे खिसे भरण्यासाठी हे सरकार काम करीत आहे. त्यामुळे येणार्‍या काळात जनतेचे हित राखण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करायचे आहे, असे आवाहन आ. सुनील भुसारा यांनी केले.

### श्रमजीवींच्या विश्वासावर शेकाप उभा : माजी आ. पंडित पाटील



काही कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षातून अन्य पक्षात प्रवेश केला. त्यामुळे मुरुडमध्ये पक्ष संपला असे नाही, तर गोरगरीब, श्रमजीवींच्या विश्वासावर स्वाभीमानाने उभा राहणारा शेकाप आहे. सुनील तटकरेंच्या यशामागे अनिल तटकरेंचे मोलाचे योगदान राहिले आहे. मात्र त्यांच्याशीच सुनील तटकरेंनी गद्दारी केली आहे. त्यामुळे या निवडणुकीत सुनील तटकरेंना पाडण्याचा निर्धार आपल्याला करायचा आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन पंडित पाटील यांनी केले. त्यापुढे ते म्हणाले, एकेकाळी राष्ट्रवादी व शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या जिल्ह्यात शेकापच्या मिनाक्षी पाटील २५ हजार मतांनी निवडून आल्या होत्या. आता इंडिया आघाडी पक्की झालेली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत इंडिया आघाडीचाच उमेदवार निवडून येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार खर्‍या अर्थाने रुजविण्याचे काम करायचे आहे. देशाबरोबरच राज्यात परिस्थिती बिकट आहे. देशाचे संविधान धोक्यात येण्याची स्थिती निर्माण झाली आहे. पुढे निवडणुका होणार की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आतापासूनच सर्वांनी वैचारिक अदान-प्रदान करण्याची गरज आहे. जागरूकपणे तरुणांसह सर्वांनी मतदान करून उद्याच्या निवडणुकीला सामोरे जायचे आहे.

– माजी आ. अनिल तटकरे

मुरुड येथील शेतकरी कामगार पक्षाच्या निर्धार मेळाव्याचे आभार प्रदर्शन रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले. निर्धार मेळाव्याचे प्रास्ताविक तुकाराम पाटील तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संदीप जगे यांनी केले. या निर्धार मेळाव्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मुरुडमध्ये गर्दी केली होती. लाल बावट्याच्या घोषणांनी मुरुड शहर दुमदुमून गेले होते. हिंदू बोर्डींग परिसरदेखील कार्यकर्त्यांनी फुलून गेला होता.

## बॅटर्‍यांची वाहतूक करणार्‍या ट्रकला आग

। उरण । वार्ताहर ।



भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील जी.डी.एल. या मालाची हाताळणी करणार्‍या गोदामातून बंगलोर शहराकडे बॅटर्‍यांची वाहतूक करणार्‍या ट्रकला मंगळवारी (दि.२६) रात्री ८ वाजून ४५ मिनिटांच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली आहे. सदर आग ही भेंडखळ बस स्थानकानजीकच्या पेट्रोल पंपाजवळील रस्त्यावर लागली, मात्र ट्रक चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.

भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील जी.डी.एल. या मालाची हाताळणी करणार्‍या गोदामातून विद्युत वाहक बॅटर्‍या घेऊन २५ ट्रक बंगलोरच्या दिशेने मंगळवारी निघाले होते. ट्रक चालक दिनेश घावटे हे तहान लागली म्हणून भेंडखळ बस स्थानकाजवळ पाणी घेण्यासाठी ट्रकमधून उतरले. त्यावेळी ट्रकमधून धूर आणि वास येत असल्याचे निदर्शनास आले.यावेळी त्यांनी मदतीसाठी लोकांना पाचारण केले. तसेच जवळील पेट्रोल पंपावरील अग्नी प्रतिबंध उपकरणे घेऊन आग लोकांच्या मदतीने विझविण्याचा प्रयत्न केला.१०० नंबरवर संपर्क केला.परंतु प्रत्युत्तर मिळाले नाही.

अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनेचे गांभीर्य ओळखून घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्याच दरम्यान उपस्थित नागरिकांनी सहकार्य केल्याने मोठा अनर्थ टळला.

## तटरक्षक दलाची अवैध मासेमारी बोटींवर कारवाई

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

एलईडी व पर्ससीन मासेमारी करणार्‍या ४ बोटी समुद्रात पकडल्या



एलईडी व पर्सनेट मासेमारी करण्यावर बंदी असतानासुद्धा काही मच्छीमार बांधव कोणालाही न जुमानता कायदा धाब्यावर बसून खोल समुद्रात मासेमारी करत असताना मुरूड येथील भारतीय तटरक्षक दलाने २ एलईडी व २ पर्ससीन जाळ्याद्वारे मासेमारी करणार्‍या समुद्रात बोटी पकडल्या. ही या आठवड्यातील तटरक्षक दलाची ही दुसरी कारवाई आहे.

भारतीय तटरक्षक जवान समुद्रात ‘सुजीत अग्रीम’ जहाजावरुन टेहळणी करत असताना पहाटे ४ बोटी वेगवेगळ्या अंतरावर एलईडीद्वारे मासळी पकडत असताना निर्दशनास आल्या. तटरक्षक दलाच्या जवानांनी बोटींना घेराव घालून बल्लाळेश्वर, सिध्दीविनायक, कुलस्वामिनी आदी ६ सिलेंडरच्या ४ बोटी खोल समुद्रात एलईडी व पर्ससीन जाळ्याद्वारे मच्छी पकडणार्‍या २ पर्ससीन नेट व २ एलईडी बोटीवर असणार्‍या खलाशांना पकडून मत्स्यविकास व परवाना अधिकारी याना कळविण्यात आले. तटरक्षक दलाच्या जवानांनी २० मार्चला ४ एलईडी व ६ पर्ससीन नेट बोटी पकडल्या होत्या.या बोटीतून लाखो रुपयांची मच्छी हस्तगत केली होती.

याबाबत अधिक माहिती देताना मुरुड तालुक्याचे मत्स्यविकास व परवाना अधिकारी तुषार वाळुंज यांनी सांगितले की, भारतीय तटरक्षक जवानांनी पहाटेच्या दरम्यान एलईडी व पर्सनेट मासेमारी करणार्‍या ४ बोटीवरील ३७ खलाशांना पकडले असून त्यांची चौकशी करुन महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम व सुधारित अध्यादेश अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

तटरक्षक दलाचे अधिकारी माहिती देताना म्हणाले की, आमचे जवान गस्त घालताना पहाटेच्या दरम्यान खोल समुद्रात बोटी संशयीत दिसून आल्यावर जवानांनी एका बोटीला घेराव घातला. त्या बोटीतून एलईडी समुद्राच्या पाण्यात टाकलेली दिसून आल्यावर त्यांना ताब्यात घेतल्यावर बाकीच्या बोटी पळू लागल्या पळत असताना आमच्या जवानांनी त्या सर्व बोटींना ताब्यात घेतल्यावर चौकशी दरम्यान या ४ ही बोटी बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास आले. या चार बोटीत ३७ खलाशी आढळून आले. त्यापैकी एक १२ वर्षाचा मुलगा आहे. हे सर्व सुलतान पुरी उत्तरप्रदेशचे रहिवासी आहेत.पकडलेल्या २ बोटीतून १ टनपेक्षा जास्त मच्छी,२२ एलईडी अंदाजे १८ लाख रुपये,३ जनरेटर, पर्ससिन नेट असा ३० लाख रुपयांचा माल हस्तगत करुन मत्स्य विकास व परवाना अधिकारी यांच्याकडे देण्यात आला, अशी माहिती तटरक्षक दलाचे अधिकारी यांनी दिली.

### अंबा नदीची पाणी पातळी घटली; जॅकवेलमध्ये ६ फूट गाळ

# पाण्याविना पालीकर झाले कासावीस

। पाली /बेणसे । वार्ताहर।

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहराला थेट अंबा नदीतून कोणतीही शुद्धीकरण प्रक्रिया न करता पाणीपुरवठा केला जातो. वर्षाचे १२ महिने पालीला पाणी समस्येने ग्रासले आहे. आता आंबा नदीची पाणी पातळी प्रचंड घटली आहे. तसेच जॅकवेलमध्ये तब्बल सहा फूट गाळ साचला आहे. हा गाळ काढण्यासाठी पालीतील पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

उन्हाळ्याच्या तोंडावर अंबा नदीची पाणी पातळी घटल्याने पालीकरांना आगामी काळात पाणी पुरवठ्याचा विषय चिंतेचा झाला आहे. तसेच पाणी टंचाई उद्भवण्याची शक्यता आहे. शिवाय दोन दिवस पालीकरांचे पाण्यावाचून हाल देखील झाले आहेत.

ज्यांच्याजवळ कुठेही विहीर किंवा बोअरवेल नाही त्यांना लांबून पाणी आणावे लागते.जॅकवेलमधील गाळ काढण्यासाठी दोन दिवस पाणीपुरवठा बंद करण्यात येईल या प्रकारच्या सूचना नगरपंचायत मार्फत नागरिकांना देण्यात आल्या आहेत. असे नगरसेवक अशिक मणियार यांनी सांगितले.



पालीकरांसाठी जवळपास २७ कोटींची शुद्धपाणी पुरवठा योजना मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. राजकीय हेवेदावे आणि लालफितीत ही योजना अडकल्यामुळे पालीकर अजुनही शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी व तत्कालीन मंत्री यांनी शुद्धपाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन दिले आहे. मात्र अजून काहीच झालेले नाही. प्रशासन व राजकारण्यांना पालीकरांचे हाल दिसत नाहीत. केवळ निवडणुकीपुरते आश्वासन दिले जाते असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

निर्माल्य प्लास्टिकच्या पिशव्यांमधून थेट अंबा नदीत टाकले जाते. या प्लास्टिकच्या पिशव्या जॅकवेलमध्ये जाऊन साठतात. त्यामुळे पाणीपुरवठा करण्यास अडथळा निर्माण होतो. तसेच हे टाकलेले निर्माल्य कुजल्याने देखील पाणी खराब होते. नगरपंचायत कर्मचारी नियमित जॅकवेलजवळील नदी पत्रातील निर्माल्य व निर्माल्याच्या पिशव्या काढून टाकतात. वारंवार निर्माल्य टाकले जात असल्यामुळे प्रश्न जटिल होतो.

अंबा नदीच्या पाण्याची पातळी घटली आहे. तसेच जॅकवेलमध्ये मोठ्या प्रमाणात चिखल व गाळ साठला आहे. ते काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून काम पूर्ण झाल्यावर पालीकरांना सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी दोन दिवस सहकार्य करावे. तसेच निर्माल्य प्लास्टिकच्या पिशव्यांमधून टाकू नये.

- सचिन जवके, नगरसेवक, पाली नगरपंचायत

## विनयभंग प्रकरणी आदिवासींवर गुन्हा दाखल

। नागोठणे । वार्ताहर ।

बकर्‍या चारण्यासाठी गेलेल्या आदिवासी महिलेने फिर्यादी व साक्षीदार यांना शिव्या दिल्या. त्यानंतरयाचआदिवासीमहिलेसोबत आलेल्या इतर तीन आदिवासी पुरुषांपैकी एका आदिवासीने फिर्यादी यांच्या पत्नीचा हात पकडून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याप्रकरणी चार आदिवासींविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत मांडवशेत येथे आरोपी नं. ४ ही आदिवासी महिला बकर्‍या चारण्यासाठी आली असता ती फिर्यादी व साक्षीदार यांना शिव्या देऊन निघून गेली. त्यानंतर त्याच रागातून पुन्हा सायंकाळी महिलेच्या सोबत तिचे इतर तीन नातेवाईक यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांच्या घरी आले. घरात प्रवेश करून फिर्यादी व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. आरोपी क्र. तीन यांनी फिर्यादी यांच्या पत्नीचा हात धरून तिच्या मनास लज्जा उत्पन्न करून धक्काबुक्की केली. साक्षीदार कामगार याला देखील त्यांच्या रूममध्ये प्रवेश करून धक्काबुक्की करूनमारहाण केली. आरोपी नं. १ यांनी तुमच्यावर अ‍ॅट्रॉसिटीची टाकून पाच लाख रूपये भरून घेईन अशी धमकी दिली.याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'वंचित'चा वेगळा मार्ग

प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीसोबत न जाण्याचा निर्णय घेतला आहे. यंदा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आंबेडकरांसोबत खूप पूर्वीच युती केल्याचे जाहीर केले होते. आंबेडकर यांनीही भाजप आणि नरेंद्र मोदी यांच्या हुकुमशाहीविरुध्द सातत्याने टीका केली होती. त्यामुळे त्यांचा व महाविकास आघाडीचा समझोता होईल अशी आशा सर्वांना वाटत होती. पण त्याबाबतची चर्चा पत्रकार परिषदा आणि माध्यमांमधूनच अधिक झाली. दोन्ही बाजूंच्या नेत्यांनी एकमेकांना जाहीरपणे इशारे व प्रत्युत्तरे देणे, आरोप करणे यामुळेच ही चर्चा गाजली. प्रत्यक्ष पडद्याआड झालेल्या बोलण्यांचा दर्जा काय असेल याची कल्पना यावरून येत होती. तरीही मोदी पराभूत व्हावेत असे वाटणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेला या दोन शक्तींनी एकत्र यावे असे वाटत होते. त्यातून भाजपविरोधात पुरोगामी शक्तींची एकजूट दिसली असती. पण तसे झाले नाही. आंबेडकरांचा पूर्वीचा अनुभव फार चांगला नसल्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आरंभापासूनच सावध होते. अर्थात हेही खरे की, सुंभ गेला तरी पीळ जळलेला नाही अशी या दोन्ही पक्षातल्या अनेक नेत्यांची स्थिती आहे. त्यामुळे 'वंचित'ची कमीत कमी जागांवर बोळवण करण्याचा त्यातल्या बहुतेकांचा प्रयत्न होता. दुसऱ्या बाजूने 'वंचित'च्या नेतेही अशक्यप्राय मागण्यांवर अडून बसले होते. आपल्याला नेमक्या किती व कोणत्या जागा हव्या आहेत हे ते सांगत नव्हते वा या मागण्या सतत बदलत होते. मध्यंतरी, आपली २७ जागांवर लढण्याची तयारी झालेली आहे अशी घोषणा केली. काँग्रेसचे नेते आपल्याला सन्मानाने वागवत नाहीत व बैठकांना बोलवत नाहीत असेही त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे आंबेडकर आणि महाविकास आघाडी खरेच एकत्र येऊ पाहत आहेत की नाही असा प्रश्न निर्माण होत होता.

## काँग्रेसच्या जागांवर डोळा

आंबेडकरांची पहिली युती ठाकरे यांच्यासोबत होती. शिवाय आघाडीतील जागावाटपामध्ये सर्वाधिक जागा ठाकरे सेनेच्याच वाट्याला जाणार होत्या. त्यामुळे सेनेने आपल्या कोट्यातून आंबेडकरांना जागा द्याव्यात असा शरद पवार यांचा प्रयत्न होता. मात्र आंबेडकरांचा डोळा हा विदर्भ व मराठवाड्यातील बहुतांश अशा जागांवर होता ज्या पारंपरिक काँग्रेसच्या बालेकिल्ले म्हणून ओळखल्या जातात. गडचिरोली, चंद्रपूर, रामटेक, यवतमाळ, नांदेड इत्यादी त्या जागा होत्या. भाजपविरोधातील वातावरण, मराठा आरक्षणामुळे ओबीसींमध्ये निर्माण झालेला असंतोष यामुळे या जागांवर काँग्रेसला फायदा मिळण्याची शक्यता होती. २०१९मध्ये यातील अनेक जागांवर 'वंचित'ला तिसऱ्या क्रमांकाची व लक्षणीय मते मिळाली होती. पण त्यावेळी एमआयएम हा पक्ष 'वंचित'सोबत होता. आता तो नाही. 'वंचित'ची ही मतपेढी अबाधित आहे का याबाबत काहीशा शंका आहेत. शिवाय काहीही असले तरी यापैकी बहुसंख्य जागांवर काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर होती व त्या लोकसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेसचे अनेक आमदार आहेत. 'वंचित'ने यातल्या अधिकात अधिक जागा मागणे आणि महाविकास आघाडीने काहीच देऊ न करणे या दोन टोकांच्या भूमिकांची सांधेजोड होणे गरजेचे होते. त्यासाठी दोन्हीकडच्या नेत्यांनी व्यापक हित लक्षात घेऊन निर्णय करायला हवा होता. पण ते घडले नाही हे अत्यंत दुर्दैवी आहे. अर्थात, वंचित व महाविकास आघाडी ही गेल्या वेळी लोकसभा किंवा विधानसभेला एकत्र लढलेली नव्हती. त्यांच्या एकत्र येण्याची चर्चा अलिकडेच चालू झाली होती व तिच्यातही वर म्हटल्याप्रमाणे अनेक खाचखळगे होते. त्यामुळे 'वंचित'ने वेगळा मार्ग पत्करण्याचा महाविकास आघाडीच्या मतदारांना फार धक्का बसेल असे नव्हे. त्यासाठी त्यांची मानसिक तयारी झालेली होतीच. आता, गेल्या दहा वर्षात, विविध कारणांनी मोदींच्या राजवटीविरुध्द जे काही लोकमत तयार झाले आहे त्याला आवाहन करणे व ते आपल्यामागे उभे राहावे यासाठी एकजुटीने प्रयत्न करणे हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना करावे लागणार आहे. 'वंचित'मुळे या मतांमध्ये होणारी फाटाफूट त्यांना गृहित धरून डावपेच आखावे लागणार आहेत.

## 'तोडत्या'ला जरांगेंचा आधार

दरम्यान, 'वंचित'ला आता जरांगे पाटील यांची शक्ती येऊन मिळणार आहे. आंबेडकर यांनी याबाबतची घोषणा बुधवारी केली. जरांगे पाटील यांच्या आंदोलनातर्फ प्रत्येक मतदारसंघात दोनतीनशे उमेदवार उभे करण्याची कल्पना आली होती. पण ती बारगळली. आता प्रत्येकी एक उमेदवार उभा करण्याचे ठरते आहे. शिंदे सरकारने मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण देण्याचे जाहीर केल्यानंतर जरांगे यांच्या आंदोलनाचा जोर कमी झाला आहे. सगेसोयरे यांच्याबाबतच्या मागणीचा प्रभाव मराठवाड्यापुरताच मर्यादित आहे. बाकी ठिकाणच्या सकल मराठा समाजाच्या नेत्यांनी तिच्याबाबत फार उत्साह दाखवलेला नाही. त्यामुळे निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना हिसका दाखवण्याचे जरांगे यांचे मनसुबे केवळ मराठवाड्यातच काही अंशी यशस्वी होऊ शकतात. आता जरांगे व आंबेडकरांच्या युतीमुळे मराठा व ओबीसी तसेच दलित हे एकत्र येऊन मोठी शक्ती निर्माण होते का हे पाहावे लागेल. आजवरचा अनुभव पाहता या शक्तीच्या जोरावर उमेदवार विजयी होणे कठीण असले तरी प्रतिस्पर्धी उमेदवारांचा पाडाव नक्कीच होऊ शकतो. याचा फटका महाविकास आघाडी आणि महायुती या दोहोंनाही बसू शकेल. आरक्षणाच्या प्रश्नावरून वातावरण पेटलेले असताना मराठा व ओबीसी या दोहोंमध्ये दुरावा निर्माण झाला होता. दोन्हीकडचे समाज राजकीय नेत्यांना धडा शिकवण्याची वाट पाहत आहेत. जरांगे आणि आंबेडकरांच्या ऐक्यामुळे हे समाज स्थानिक पातळीवर एक होऊन एका दिशेने मतदान करतील का हा लाखमोलाचा प्रश्न आहे. शिवाय या लोकसभा निवडणुकीत मोदी विरुध्द बाकी सगळे असे ध्रुवीकरण झालेले असताना हा विषय किती महत्वाचा ठरेल हाही सवालच आहे. जरांगे यांना सोबत न घेतल्याबद्दल आंबेडकरांनी महाविकास आघाडीला दोष दिला आहे. तो मात्र निरर्थक आहे. जरांगेच्या मागणीला आघाडीचा पाठिंबा होताच. शिवाय, जरांगे यांनी स्वतःची राजकीय भूमिका आजतागायत स्पष्ट केलेली नाही. आंबेडकर वेगळे होताना जरांगे यांचा आधार घेत आहेत इतकाच त्याचा अर्थ आहे.

विचार

# मोठी गुंतवणूक येतेय, सजग रहायला हवे

**युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन भारतात १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. या करारामुळे भारतातील आयटी सेवांची निर्यात वाढून कुशल मनुष्यबळाला परदेशात अधिक संधी प्राप्त होईल. येत्या सहा वर्षांमध्ये भारतातून दोन ट्रिलियन डॉलर्स इतक्या मालाची निर्यात करण्याचे लक्ष्य असल्याने भारताला विविध देशांशी मुक्त व्यापाराचे करार करुन कर घटवावे लागतील. अर्थात खुलीकरण हे एकतर्फी नव्हे, तर दुतर्फी असले पाहिजे.**




**हेमंत देसाई**

जगभर व्यापारवृद्धीसाठी करार केले जातात. त्यात दोन्ही बाजुंचा फायदा विचारात घेतला जातो. कधी मैत्रीपूर्ण करारात संबंधांना फायद्यापेक्षा जास्त महत्त्व द्यावे लागते. भारताची १४४ कोटींची बाजारपेठ अनेकांना खुणावत असते. एवढ्या मोठ्या बाजारपेठेत शिरकाव करण्यासाठी जगातील अनेक देश प्रयत्नशील असतात. भारताने 'युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन (ईएफटीए)शी नुकताच करार केला. 'ईएफटीए' मध्ये आइसलँड, लिंच्टेंस्टीन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड यांचा समावेश आहे. हे चार देश युरोपीयन महासंघाचे सदस्य नाहीत; पण 'ईएफटीए' नावाचा त्यांचा वेगळा गट आहे. भारत आणि 'ईएफटीए' यांच्यातील हा करार गेल्या १६ वर्षांमधील २१ फेऱ्यांच्या वाटाघाटीनंतर झाला आहे. त्यामुळे भारताचा युरोपमधील या चार देशांसोबतचा व्यापार सोपा होणार आहे. त्यांच्याकडून भारतात पुढील १५ वर्षांमध्ये १०० अब्ज डॉलर (सुमारे आठ लाख कोटी रुपये) गुंतवणूक अपेक्षित आहे. यामुळे भारतात नवीन कंपन्या उघडतील आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. भारताला आइसलँड, लिंच्टेंस्टीन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंडसोबत व्यवसाय करणे सोपे होईल. याचा अर्थ आपण या देशांना अधिक माल विकू शकू आणि तिथूनही स्वस्त वस्तू आणू. पूर्वी सर्व वस्तू चीनमधून यायच्या; पण आता प्रत्येक देश चीनला पर्याय शोधतो आहे. अशा परिस्थितीत भारतासाठी ही मोठी संधी आहे. हा करार भारतासाठी का महत्त्वाचा आहे, त्यातून कोणत्या क्षेत्राला फायदा होईल, कोणाला तोटा होईल आणि सध्या भारतासमोर कोणती आव्हाने आहेत हे समजून घेतले की करार कोणाच्या फायद्याचा आणि कुणाच्या तोट्याचा हे समजू शकेल.

'ईएफटीए' म्हणजेच 'युरोपीयन फ्री ट्रेड असोसिएशन' हा चार देशांचा समूह आहे. या चार देशांमधील व्यापाराला चालना देणे हे 'ईएफटीए'चे मुख्य कार्य आहे. याचा अर्थ या देशांमधील वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर कोणताही कर नाही. 'ईएफटीए' हा भारताचा पाचवा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२३ मध्ये, भारत आणि 'ईएफटीए' देशांदरम्यान २५ अब्ज डॉलरचा व्यापार झाला. 'ईएफटीए' १९६० मध्ये सुरू झाला. युरोपीय संघाशी स्पर्धा करण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली. त्याचे मुख्यालय स्वित्झर्लंडमधील जीनिव्हा येथे आहे. यामध्ये समाविष्ट केलेल्या चार देशांची एकूण लोकसंख्या १३.५ दशलक्ष इतकी आहे. त्यांचा एकूण जीडीपी सुमारे १.१ ट्रिलियन डॉलर्स आहे. 'ईएफटीए'ने आतापर्यंत युरोपबाहेरील सुमारे ४० देशांसोबत ३० व्यापार करार केले आहेत.

युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशनने (इफ्टा) भारतात १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याचे अभिवचन देणे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. येत्या पंधरा वर्षांमध्ये भारताचा विकासदर साडेनऊ टक्के राहील आणि तोही डॉलरच्या हिशेबात राहील, हे गृहीत धरून या प्रकारचे वचन देण्यात आले आहे. दिलेले अभिवचन असोसिएशनने पूर्ण केले नाही, तर भारत सरकार परदेशी थेट गुंतवणुकीसाठी देत असलेल्या करसवलतींचा पुनर्विचार करू शकेल, असेही या देशांकडून सांगण्यात आले आहे. परंतु व्यापारतज्ज्ञांच्या मते एकदा दिलेल्या सवलती काढून घेणे खूप कठीण जाईल. याचे कारण भारतात या चार देशांच्या संघटनेतर्फे गुंतवणूक केली जाणार आहे. ते मुख्यतः खासगी क्षेत्र असून या असोसिएशनतर्फे गुंतवणूक विकासाबाबत देण्यात आलेल्या शब्दाची कायदेशीर व्याख्या करणे हे कठीण आहे. केवळ तत्त्व म्हणून भारतात अमुक इतकी गुंतवणूक केल्यास तमुक इतक्या सवलती देऊ, असे सांगणे ही चांगलीच बाब आहे. कारण सवलती देऊन नेमका काय उपयोग झाला, हे त्यामुळे दाखवून देणेही सोपे जाते. अपेक्षित गुंतवणूक झाली असेल तर सवलतींचे धोरण योग्य होते, असे सांगता येते आणि अपेक्षित गुंतवणूक न झाल्यास धोरण फसले असे मान्य करावे लागते.

प्रत्यक्ष करार केला जातो, तेव्हा त्याची शब्दरचना ढोबळ असते आणि अनेक पूर्वअटी घातलेल्या असतात. त्यामुळे कराराचे पालन न झाल्यास, अटींचा भंग झाला म्हणून ठरल्याप्रमाणे कारवाई करणे शक्य होईल की नाही हा प्रश्नच असतो. 'इफ्टा' या संघटनेने त्यांच्या देशातील विविध खासगी कंपन्यांना करसवलत मिळणार आहे, असा शब्द दिल्याशिवाय त्या कंपन्या गुंतवणूक करणार नाहीत. शिवाय सॉव्हरिन वेल्थ फंडामार्फत गुंतवणूक आली असेल, तर ती फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंटच्या कक्षेत येते. परंतु पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंट ही भारतीय शेअर बाजारात केली जाते. शेअर बाजारात परतावा मिळाला नाही अथवा बाजार कोसळला, तर ही गुंतवणूक काढून घेतली जाते. त्यामुळे पोर्टफोलिओ गुंतवणुकीस भारताच्या विकासाच्या दृष्टीने काही महत्त्व नाही. महत्त्व आहे, ते थेट परकीय भांडवल गुंतवणुकीला.

आज भारताचा विचार केला, तर महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू यासारख्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात परदेशातून भांडवल येत आहे. इफ्टा देशांमधून येणाऱ्या ९५ टक्के मालावर आयात करसवलती दिल्या जातील, असे आश्वासन भारतातर्फे देण्यात आले आहे. आपल्या देशात तेथून सोन्याची मोठ्या प्रमाणावर आयात होते आणि त्यावरही किरकोळ का होईना, सवलत देण्याचे आपण मान्य केले आहे. अर्थात ज्या क्षेत्रात भारताने उत्पादनसंलग्न प्रोत्साहन योजना जारी केली आहे, त्या क्षेत्रातील कच्च्या मालाच्या आयातीवर दीर्घकाळ सवलती दिल्या जातील. कारण त्या क्षेत्रात भारतातील उद्योग क्षेत्र अधिक समर्थ होऊन आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धा करण्यात सिद्ध व्हावे, असे आपले धोरण आहे. गेल्या दोन दशकांमध्ये इफ्टा देशांमधून दहा अब्ज डॉलर्स इतकी गुंतवणूक आकर्षित झाली. आता ती दहापट वाढवायची असेल, तर त्यासाठी तशा प्रकारची प्रोत्साहक योजना राबवण्याची गरज आहे. परंतु केवळ व्यापार खुला केल्यामुळे भांडवल गुंतवणूक येईल, असे नव्हे. येथील प्रशासकीय कारभार पारदर्शक असण्याची गरज आहे. भारतीय बंदरातून मालाच्या चढ-उताराचा वेग मंद आहे. म्हणजे भारतीय बंदरातून माल उतरवून घेताना किंवा तो निर्यात करताना काही दिवस लागतात. जगाच्या बाजारात अनेक बंदरांमध्ये काही तासांमध्ये हे काम पार पाडले जाते. २०१९-२० ते २०२३-२४ या काळात भारताचा एकूण वार्षिक समुच्चित विकासदर ४.१ टक्के इतका होता. २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत तो ७.४ टक्के इतका होता. म्हणजे यापुढे हा दर किमान दुपटीने वाढवावा लागेल. विकासाची ही गती नसेल, तर त्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक आपल्याकडे येणार नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.

गेल्या काही वर्षांमध्ये नरेंद्र मोदी सरकार हे विविध देशांशी व्यापारी करार करत आहे. नुकताच ऑस्ट्रेलियाबरोबर आर्थिक सहकार्याचा आणि व्यापाराचा करार करण्यात आला. तर संयुक्त अरब अमिरातीसमवेत व्यापक आर्थिक भागीदारीचा करार झाला. ब्रिटन आणि युरोपीयन युनियन म्हणजेच ईयूशीही आपली बोलणी सुरू आहेत. गेल्या रविवारी ईयूबरोबर करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दिलेल्या शब्दाप्रमाणे इफ्टामधून भांडवल आल्यास दहा लाखजणांना रोजगार मिळू शकेल.

इफ्टा देशांपैकी स्वित्झर्लँडशी भारताचा मोठ्या प्रमाणात व्यापार आहे. त्यानंतर क्रमांक लागतो तो नॉर्वेचा. स्विझर्लंडमधून भारत प्रचंड प्रमाणात सोने आयात करतो. त्यामुळे त्या देशाबरोबरच्या आपल्या व्यापारात तूट आहे. आता इफ्टा देशांमधून येणारी यंत्रसामग्री, औषधे, घड्याळे, खते, रासायनिक पदार्थ उत्पादने वगैरेंवरील कर रद्द केले जातील किंवा कमी केले जातील. अर्थात या करारातून शेती उत्पादने वगळण्यात आली आहेत. कारण परदेशातून भारतात शेतमाल आला, तर इथले शेतकरी उपाशी मरतील. बिगरशेती उत्पादनांना मात्र भारताची प्रचंड बाजारपेठ खुली करून देण्यात आली आहे.

या करारामुळे भारतातील माहिती तंत्रज्ञानासारख्या सेवांची निर्यात वाढणार आहे. तसेच भारतातील कुशल मनुष्यबळाला परदेशात अधिक संधी प्राप्त होऊ शकतील. येत्या सहा वर्षांमध्ये भारतातून दोन ट्रिलियन डॉलर्स इतक्या मालाची निर्यात करण्याचे लक्ष्य ठरवण्यात आले आहे. त्यासाठी भारताला विविध देशांशी मुक्त व्यापाराचे करार करावे लागतील. तसेच कर घटवावे लागतील. त्याचबरोबर इफ्टा देशांनीही आपल्या बाजारपेठेतील नियंत्रणे घटवली पाहिजेत. खुलीकरण हे एकतर्फी नव्हे, तर दुतर्फी असले पाहिजे.

आजकाल

# कुराण फक्त वाचू नका ते समजून घ्या

**पैगंबर शेख**

मी रमजान महिन्यात कुठल्याही मशिदीत नमाजला जात असताना माझे कुराण सोबत घेऊन जात असतो. मी ते तिथे वाचतो आणि पुन्हा घरी घेऊन येतो. ही सवय साधारण गेल्या १० वर्षांपासूनची आहे. गेल्या १० वर्षात रमजान महिन्यात मी ६ वेळा कुराण वाचले आहे. यंदाची कुराण वाचण्याची ही ७ वी वेळ. ज्यावेळी कुराण वाचले नाही त्यावेळी रोजेही ठेवले नाहीत. ज्यावेळी रोजे ठेवले त्याचवेळी कुराणही वाचले आहे.

महत्वाची बाब म्हणजे मला अरबी येत नाही. मला उर्दू लिपी वाचता येत नाही. मी ज्या काही मशिदींमध्ये आत्तापर्यंत कुराण जाऊन वाचले ते मराठी आणि हिंदी भाषेतच वाचले आहे. कुराण वर चर्चा करताना आपण सुरह आणि आयात नंबर सांगावे आपल्याला त्यातून मिळालेला बोध आणि अन्वयार्थ सांगावा, मी माझा बोध आणि अन्वयार्थ सांगतो. त्यावर चर्चा करू. एवढा साधा सोपा विचार मी करतो. यापेक्षा सोपं अजून काय असू शकत? 'तुम्ही कुराण वाचले नाही तर भाषांतर वाचले' मला असे बोलणाऱ्या प्रत्येकाला माझे हेच सांगणे असते.

असो, तर एका मशिदीत नमाज नंतर मराठी भाषांतरित कुराण वाचन करत असताना तिथे काही जण माझ्याकडे आले. त्यांनी माझ्याकडील मराठीतील कुराण पाहिले आणि म्हणाले हे असे वाचले तर चालते का? मी म्हणालो का चालत नाही? तुम्ही अरबी मध्ये कुराण वाचता ते तुम्हाला समजते का? ते म्हणाले नाही. मग वाचून फायदा काय? हा प्रश्न मी विचारला. मग ते म्हणाले, पुण्यप्राप्तीसाठी वाचतोय. मी म्हणालो, कुराण वाचन करण्याचा प्रथम उद्देश ज्ञान प्राप्ती करणे हा असायला पाहिजे. त्यात लिहिले काय आहे हे आयुष्यभर तुम्हाला समजणारच नसेल तर फायदा काय? आणि याने नक्की कसलं पुण्य प्राप्त होणार आहे? मग ते म्हणाले, तुमचं बरोबर आहे. आपण त्याचा अर्थही जाणून घेतला पाहिजे. बर, ज्या लोकांना त्यातील थोडा फार अर्थ माहिती देखील आहे ते कुठल्या भाषेत लोकांना सांगतात? तर लोकांना समजेल अशाच भाषेत. लोकांना अरबी समजते का? अर्थातच नाही. मग उगाच अरबीचा अट्टहास कशाला? जन्नतची भाषा आहे म्हणून का? कोणी सांगितले हे तुम्हाला. अल्लाह कुठल्याही एका भाषेचा बांधील नाही. सर्व भाषा अल्लाहच्याच आहेत. त्याच जमात मधील एक सदस्य माझ्याकडे आले. त्यांनी माझ्याकडे असलेल्या कुराणला हात लावला आणि म्हणाले, हे आपण मुस्लिमेतर बांधवांना पण देत असतो ना? मी म्हणालो, हो... मी स्वतः आत्तापर्यंत कित्येक मुस्लिम आणि मुस्लिमेतर बांधवांना मराठी मधील कुराण दिले आहे. त्यात विशेष काय आहे?

ते महोदय म्हणाले, तसे नाही यात अरबीमध्ये लिहिलेले आहे. त्याला ते हात वगैरे लावतील तर ते अपवित्र होणार नाही का? मी म्हणालो, कशामुळे ते अपवित्र होईल? तो एक कागद आहे आणि त्यावर कुराण लिहिलेलं आहे. एवढंच आहे ते. ते ज्ञान संपादन करण्याचे माध्यम आहे. त्याला जगात कुठल्याही मुस्लिमेतर बांधवाने हात लावल्याने अपवित्र कसे होईल? मुळात तुम्ही जो विचार करताय हा विचारच अपवित्र आहे. इस्लाम मध्ये अशा विचारांना कुठेही थारा नाही. कुठलाही मुस्लिमेतर बांधव कुराण हातात घेऊ शकतो. तो ते वाचू शकतो. आणि कुठल्याही मुस्लीमेतर बांधवांना तुम्ही कुराण बिनधास्त देऊ शकता.

ते महोदय जमात मध्ये आले होते. त्यांचे बहुदा यामुळे डोळे उघडले. पुढे बॅक इन द माईंड हा विचार नक्कीच त्यांच्यात राहील. इंशा अल्लाह...

तर मित्रहो, कुराण सर्वात आधी मातृभाषेत वाचा. ते घोकंपट्टी करण्यासाठी नाही तर समजून घेण्यासाठी वाचा. ते ज्ञानप्राप्ती करण्यासाठी वाचा. ज्ञान प्राप्ती करणे हे पुण्याचेच काम आहे. इंशा अल्लाह सर्वजण याकडे लक्ष देतील ही अपेक्षा आहे...

यावेळी तुकाराम महाराजांची आठवण आल्याशिवाय मला राहत नाही. तुकोबा म्हणतात...

**अर्थेविण पाठांतर कासया करावें ।**
**व्यर्थचि मरावें घोकूनियां ।।**
**घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे ।**
**अर्थरूप राहे होऊनियां ।।**
**तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटी ।**
**नाहीं तरी गोष्टी बोलों नका ।।**
**तुकाराम महाराज की जय**

लोकसंसद

## मंदिर परिसरांत मद्य आणि मांस यांची विक्री नको !


राज्यात अष्टविनायकांसह अनेक पुरातन मंदिरे आहेत, ज्यामध्ये प्रतिदिन भाविकांची रीघ लागलेली असते. अनेक मंदिरांना पर्यटनस्थळांचा दर्जा दिला गेल्याने या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी विविध सुविधा निर्माण केल्या गेल्या आहेत. ज्यामध्ये मद्याची दुकाने आणि बिअर बार्सचाही समावेश आहे. मंदिराजवळ असणाऱ्या हॉटेल्स आणि रेस्टोरंटमधून मांसाहारी भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. काही ठिकाणी मंदिर परिसरात मांसविक्रीची दुकाने थाटली गेल्याचेही निदर्शनास आले आहे. पुरातन जागृत देवस्थाने हा भाविकांचा धार्मिक ठेवा आहे. मंदिरे ही हिंदूंची शक्तिस्थाने असल्याने या ठिकाणी नतमस्तक होऊन तेथील चैतन्य अनुभवण्यासाठी, या चैतन्यक्षेत्रात काही काळ घालवण्यासाठी लांबून लांबून भाविक सह कुटुंब, मित्र मंडळींसह येत असतात. मंदिर परिसरात असलेली मांस विक्रीची दुकाने, मद्याची दुकाने आणि बिअर बार्स मंदिर परिसर अपवित्र करण्याचे काम करतात. मंदिराचे पावित्र्य अबाधित राहावे आणि येणाऱ्या भाविकांना मंदिराचा आणि मंदिर परिसराचा आध्यत्मिक स्तरावर लाभ व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन मंडळ, स्थानिक प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी पुढाकार घेऊन मंदिर परिसरातील मद्यविक्रीची आणि मांस विक्रीची दुकाने हटवावीत !

**- सौ. मोक्षदा घाणेकर,** काळाचौकी, मुंबई

मराठी साहित्यिक दिनविशेष

### अठ्ठावीस मार्च

**१८८३:-** वनस्पतीशास्त्रज्ञ आणि या विषयावरील लेखक प्रा. श्रीपाद लक्ष्मण आजरेकर यांचा जन्म. डॉ.श्री. व्यं. केतकर यांच्या 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' मध्ये प्रा. आजरेकर यांनी वनस्पती विज्ञानावर लेखन केले. बुरशीच्या प्रकारांवर त्यांचा विशेष अभ्यास असल्याने बटाटा आणि कापूस या पिकांसाठी त्यांचे संशोधन उपयुक्त ठरले होते. **१८९८:-** आत्मसाक्षात्कारी संतकवी अनंतनाथ ब्रम्हचारी बोवा यांचे निधन. त्यांनी विपूल प्रमाणात काव्यरचना केली. त्यांच्या ओवींची संख्या ४० हजारच्या आसपास आहे. त्यापैकी 'श्री अनंतनाथ ब्रम्हचारी महाराज यांचे समग्र ग्रंथ भाग १,२ आणि वेदान्तभक्तिपर निवडक वेंचे प्रसिध्द झाले आहेत. **१९०३:-** मराठी साहित्यात विज्ञान, पुराण, वाङ्मय, शैक्षणिक प्रश्न आदी विषयांवर लेखन करणारे लेखक बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर यांचा जन्म २८ मार्च १९०३ रोजी झाला. बी.ए.एल. एल.बी., पी.एच.डी. डी लिट, बी.टी अशा अनेक पदव्या त्यांनी संपादन केल्या होत्या. काही काळ वकिलीही त्यांनी केली. कालांतराने ते शिक्षण क्षेत्राशी संबंधित राहिले. लेखनाची आवड असणाऱ्या कानिटकरांनी तरुण वयातच लघुकथा लिहिल्या. नाटकांचेही त्यांना आकर्षण, नाशिक येथील महाराष्ट्र नाट्य मंदिराचे ते एक संस्थापक सदस्य. 'विद्यामंदिरात' असे एक प्रहसनवजा नाटकही त्यांनी लिहिले. कालांतराने त्यांनी शास्त्रजगताकडे आपला मोर्चा वळवला. बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकरांनी विविध विषयावर मुलांच्या रंजनाबरोबर ज्ञान वाढेल अशी ज्ञानार्थी पुस्तके लिहून मराठी साहित्य दालन समृद्ध केले. त्यामध्ये 'सागराच्या तळाशी, निशेची निरांजने, पेनिसिलिन, काही महत्त्वाचे शास्त्रीय शोध, नव्या जगाचे निर्माण, कागद, विज्ञानातील गमती आदींचा समावेश आहे. भारतीय शास्त्र-पुराणांचा अभ्यास करून त्यांनी लिंगपुराण आणि वराहपुराण तसेच मत्स्यपुराण आणि विष्णुपुराण या पुराणांचा संक्षेपाने परिचय करून दिला. त्यांच्या 'ज्ञानप्रदीप' या शिक्षणविषयक ग्रंथाला नागपूर शिक्षण परिषदेचे सुवर्णपदक मिळाले. कानिटकरांनी आपल्या या अभ्यास विषयातल्या काही गमतीच्या गोष्टी, लक्षणीय घडामोडींच्या हकिकती कुंदतराव, के. मयूर, बी. चंद्रकांत, भाऊकाका, विज्ञानचंद्र, हेमांगीरमण अशा निरनिराळ्या टोपण नावाखाली प्रसिद्ध केल्या. ४ ऑक्टोबर १९७१ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. **१९२७:-** साहित्यिक डॉ. जयवंतराव पाटील यांचा जन्म. कृषी, ग्रामविकास आणि आदिवासींच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या डॉक्टरांनी 'जगाची शेती', 'जग हा त्यांचा बगीचा', 'माझे ग्राम पुर्नरचनेचे प्रयोग' ह्या कृषीविषयक पुस्तकांबरोबर, 'भारताच्या स्वातंत्र्यलढयात बोर्डीचे योगदान','बोर्डीचे स्वातंत्र्यसैनिक', 'भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील मी एक स्वयंसेवक', 'स्वातंत्र्यसैनिक मुकूंदराव सावेफ हे स्वातंत्र्यसंग्रामावर आधारीत पुस्तकांशिवाय कृषी तंत्रज्ञानाद्वारे आदिवासींचा शाश्वत विकास, आदिवासी सेवा मंडळ, ह्या पुस्तकांतून त्यांची आदिवासी समाजाविषयीची तळमळ दिसून येते. अलिकडेच त्यांच्या आयुष्यात आलेल्या थोर पुरुषांच्या सहवासावर 'थोरांच्या आठवणी' हे पुस्तक प्रसिध्द झाले. **१९३६:-** कथा, कविता, ग्रंथसमीक्षा तसेच आकाशवाणीसाठी प्रासंगिक लेखन करणाऱ्या सुमित्रा मनोहर उकिडवे यांचा जन्म. ह्यांची 'अर्धांगी' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. **१९४२:-** साहित्यिक अरुण बोरीकर यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'वसंतशोभा' ही कादंबरी, 'वळवाचा पाऊस' हा कथासंग्रह, 'काव्यप्रभा' हा काव्यसंग्रह, 'शोध' ही रहस्यकथा तसेच 'संत गजानन महाराज','अक्कलकोट स्वामी' यांच्या चरित्राशिवाय त्यांनी 'चतुर रीना', 'लाकुडतोड्या', 'वनश्री', 'पिंगळाई महात्म्य' अशी पुस्तके लिहिली आहेत. **१९४४:-** लेखिका भारती पांडे यांचा जन्म. 'दिन महत्त्वांच्या माणसांच्या महवाच्या गोष्टी ह्या महत्त्वपूर्ण पुस्तकांसह २५ अनुवादित पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. कथा, कविता अनुवाद इत्यादी साहित्यातले प्रकार त्यांनी हाताळले. **२०००:-** ख्यातनाम अर्थतज्ञ आणि साहित्यिक शांताराम द्वारकानाथ उर्फ राम देशमुख यांचे निधन. **२००६:-** कीर्तनकार बबनराव नावडीकर यांचे निधन.




**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ मार्च

१) श्री. वसंत रामचंद्र शिंदे
श्रीबाग-२ अलिबाग, २८-३-१९४३

२) श्रीम.अंजली अशोककुमार वैशंपायन
श्रीबाग-२, अलिबाग, २८-३-१९५१

३) श्रीम.सुरेखा नारायण पिसाट,
चेंढरे, अलिबाग, २८-३-१९४५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**कै. स्मिता सुधाकर कुलकर्णी, स्मरणार्थ अलिबाग**

# जिल्ह्यातील मतदान केंद्राची होणार पाहणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड लोकसभा निवडणूक प्रक्रीया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनानुसार अंमलबजावणी केली जात आहे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर सर्व मूलभूत सुविधा पुरविणे बंधनकारक आहे. या मूलभूत सुविधांची पाहणी आणि तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील मतदान केंद्राची पाहणी केली जाणार आहे.**




**■ रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बुधवारी अलिबाग चेंढरे येथील सेंटमेरी कॉन्व्हेंट स्कूल येथील मतदान केंद्राची पाहणी केली. यांच्या समवेद अलिबाग उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसिलदार विक्रम पाटील, निवडणूक नायब तहसिलदार अजित टोळकर आदी निवडणूक विभाग कर्मचारी उपस्थित होते.**

रायगड जिल्ह्यातील सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि संबंधित यंत्रणांच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्याचे काम जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुरु आहे. जिल्ह्यातील मतदान केंद्रामध्ये वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी पाहणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. आवश्यकतेनुसार डागडुजी, दुरुस्ती करावी. सर्व मतदान केंद्रांवर प्रकाश, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, रॅम्प आदींची व्यवस्था करण्यात यावी.

वेब कास्टिंगसाठी निवडलेल्या मतदान केंद्रांवर आवश्यक अटींची खात्री करावी. ज्या मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदार मतदान करतील तेथे व्हीलचेअर व स्वयंसेवकांची व्यवस्था करण्यात यावी. जिल्ह्यातील जी मतदान केंद्रे आदर्श मतदान केंद्र बनवली जातील, ती स्थानिक साहित्याने सुसज्ज असावीत. कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील किमान ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग, सीसीटीव्ही किंवा व्हिडिओग्राफीसाठी पुरेशी व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी दिल्या आहेत.

तसेच मतदान केंद्रावर पोचण्यास मतदारांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेणे, रांगेचे नियोजन करावे. सर्व मतदार केंद्रावर प्रथमोपचार सुविधांबरोबरच एक आरोग्य कर्मचारी अधिकारी नियुक्त करण्यात यावा. आवश्यक ती सर्व औषधे मतदान केंद्रावर ठेवण्यात यावीत असेही त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मतदान केंद्राची पाहणी समितीच्या मार्फत केली जाणार आहे. तेथील परिस्थितीचा आढावा घेऊन त्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली जाणार आहे.

### ७ मे रोजी होणार मतदान

**उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख १९ एप्रिल असणार असून अर्जाची छाननी २० एप्रिल रोजी केली जाणार आहे. अर्ज माघार घेण्याची प्रक्रीया २२ एप्रिल त्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. रायगड लोकसभा मतदार संघात दोन हजार १८५ मतदान केंद्र आहेत. त्यात सहा संवेदनशील मतदान केंद्र आहेत. मतदान सात मे रोजी होणार असून मतमोजणी चार जूनला होणार आहे.**

### १६ लाख मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**रायगड लोकसभा मतदार संघात रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, श्रीवर्धन, महाड या चार विधानसभा तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर दापोली या दोन विधानसभांचा समावेश आहे. तसेच, मावळ लोकसभा मतदार संघात रायगड जिल्ह्यातील कर्जत, पनवेल, उरण या तीन विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. रायगड लोकसभा मतदार संघात १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यामध्ये पुरुष ८ लाख १३ हजार ५१५, महिला ८ लाख ४० हजार ४१६ मतदारांचा समावेश आहे.**

## कालनिर्णय दिवाळी लघुकथा स्पर्धा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

'कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी' २०२४ साठी लघु लघुकथा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेकरिता लेखकांनी आपली ३०० शब्दांपर्यंतची अप्रकाशित लघुकथा पाठवायची आहे. लघु लघुकथा स्पर्धेकरिता विषयाचे बंधन नाही. प्रत्येक स्पर्धकाची एकच लघुकथा स्वीकारण्यात येणार आहे. लघुकथा कालनिर्णयच्या कार्यालयात १५ जून पर्यंत पोस्ट, कुरिअर किंवा ई-मेलनेवर पाठवावी. तसेच, सोबत लेखकाने स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो देखील पाठवायचा आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला रु. ५ हजार, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्याला रु. ३ हजार, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्याला रु. २ हजारचे बक्षीस दिले जाणार आहे. तसेच, दहा उत्तेजनार्थ विजेतेही निवडण्यात येणार आहेत. स्पर्धेविषयी परीक्षक व कालनिर्णय संपादन विभाग यांचा निर्णय अंतिम असणार आहे. छापून न आलेले साहित्य परत पाठविले जाणार नसल्याची नोंद स्पर्धकांनी घ्यावी. साहित्य पाठवण्याचा पत्ता : सुमंगल प्रेस प्रा.लि., १७२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत, एम.एम.जी.एस. मार्ग शारदा सिनेमाच्या शेजारी, दादर (पू.), मुंबई- ४०००१४ ईमेल : kathaspardha@kalnirnay.com

## किल्ले रायगडावर ध्वनी-प्रकाश शोची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

रायगड किल्ल्यावर प्रतिवर्षी लाखो शिवभक्त, गडप्रेमी, पर्यटक येऊन नतमस्तक होत असतात. परंतु महाराष्ट्राची अस्मिता असलेला हा पवित्र दुर्ग काही मूलभूत सुविधांपासून आजही वंचित आहे. येथे कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्याचे प्रशासन, स्वयंसेवी संघटनेने ठरविले तरी त्यासाठी केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागाची परवानगी घेणे आवश्यक असते. भारतात अंदमानच्या सेल्युलर जेलच्या आवारांत, हैद्राबाद नजिकच्या गोवळकोंडा किल्ल्याच्या परिसरात व अन्य काही ठिकाणी अत्यंत प्रभावी अशा ध्वनी-प्रकाश शोजचे आयोजन केलेले आहे. असा शो हे पर्यटक, इतिहास प्रेमी, अभ्यासक यांच्यापर्यंत त्या-त्या स्थळाचे स्थान महात्म्य अधिकृतपणे पोहोचविण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. परंतु, ज्या छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याचा यशस्वी कारभार रायगडावरून केला तेथे मात्र असा ध्वनी प्रकाश शो उपलब्ध नाही. शासन, जिल्हा परिषद अथवा अन्य सक्षम यंत्रणेने गडावर योग्य जागा निवडून तेथे ध्वनि-प्रकाश शो सुरु करावा, अशी मागणी अनेक शिवभक्तांकडून करण्यात येत आहे. तसे झाल्यास हिंदवी स्वराज्याच्या साऱ्या प्रभावी इतिहासाचे दर्शन लाखो पर्यटकांना, शिवभक्तांना तेथेच घेता येईल.

## बार्डी येथील तरुणाची सेंद्रिय खताची शेती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात प्रगत शेती करण्याचे पेव वाढले असून त्यात सेंद्रिय शेती करण्यावर शेतकऱ्यांचा भर दिसून येत आहे. बार्डी येथे राहणारा हेमंत कोंडीलकर या तरुणाने सेंद्रिय खतांची शेती केली असून रसायनांचा कोणताही वापर न करता कीटकनाशके तयार केली आहेत. दरम्यान, सेंद्रिय खते यांच्या माध्यमातून भाजीपाला शेती विशेष चर्चेत असून त्यांच्या शेतात अन्य भाजीपाला यांच्यासह चेरी टोमॅटो यांची यशस्वी शेती केली आहे.

कर्जत तालुक्यातील बार्डी गावातील पदवीधर तरुण हेमंत नामदेव कोंडीलकर यांनी सेंद्रिय शेतीचा पुरस्कार केला आहे. मुरूम मातीच्या जमिनीवर सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला शेती करण्याचा प्रयोग कोंडिलकर हे गेली तीन वर्षे करीत आहेत. सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला,



शेतीत विविध यशस्वी प्रयोग करत असून भाजीपाल्याच्या देशी बियाणांचा वापर करून बार्डी गावातील शेतकरी परशुराम चौधरी यांच्या शेतामध्ये सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला पिकवित आहेत. यामध्ये भरीताची वांगी, गवार, भेंडी, टेमॅटो, चेरी टोमॅटो, देशी चवळीची लागवड केली आहे. या भाजीपाला पिकांसाठी लागणाऱ्या सेंद्रिय खतांचा वापर केला आहे. सेंदिय खतांबरोबर किटकनाशके कोंबडीखत, दशपर्णी अक, ह्युमिक ॲसिड, बायोइंजाईम, फिश ऑईल, कंपोस्ट खत यांच्यापासून स्वतः तयार केली आहेत. त्यामुळे शेतीवरील उत्पादन खर्च कमी होतो आणि लोकांना विषमुक्त भाजीपाला देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे. कृषी विभागातील तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी,तसेच कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक यांच्याकडून सहकार्य आणि मार्गदर्शन लाभत आहे.

## मारहाणप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

पाईप टाकण्यावरुन तसेच पूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून फिर्यादी तसेच साक्षीदारांना कळकीची रिप व लोखंडी सळीने जमावाकडून मारहाण करण्यात आली. ही घटना रविवारी (दि.२४) दुपारच्या सुमारास पेण तालुक्यातील साखळी जांभूळटेप येथील रस्त्याचे बाजूला असलेल्या तलावाजवळ घडली. याप्रकरणी जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनूसार साखळी जांभूळटेप रस्त्याचे बाजूला असलेल्या तलावाजवळ व साखळी येथे रस्त्यावर फिर्यादी व साक्षीदार (रा. पंचवटी) हे त्यांचे मालकीच्या तळ्यात मच्छिमारी करून बाहेर निघाले. त्यावेळी चार आरोपींनी फिर्यादींना पाईप टाकण्यावरून तसेच मागील भांडणाचा राग मनात धरुन झालेल्या वादाचा राग मनात धरून शिवीगाळी करून हाताबुक्क्याने मारहाण केली. याशिवाय आरोपी क्र.१ याने तेथे असलेल्या कलकीच्या रिपेने फिर्यादींच्या डोक्यात मारल्याने रिपेला असलेली लोखंडी चूक फिर्यादीच्या डोक्यास लागून दुखापत केली. तर आरोपी क्र.२ व आरोपी क्र. ५ व ६ या तिघांनी साक्षीदाराला मारहाण केली.

रायगड जिल्हाधिकाऱ्यांचा जमावबंदीचा आदेश असतानाही वरील सर्वांनी बेकायदेशीर जमाव केल्याने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेष काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक प्रमोद कदम हे पुढील तपास करीत आहेत.

## विलास कांबळे यांना मातृशोक

**। नागोठणे । वार्ताहर ।**



नागोठण्यातील हायवे नाका येथील हॉटेल व्यावसायिक विलास कांबळे यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई शाबा कांबळे (८०) यांचे रविवारी (दि.२४) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्यांचे मूळ गाव असलेले महागाव-सुधागड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजबांधव, परिसरातील नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लक्ष्मीबाई कांबळे यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. लक्ष्मीबाई कांबळे यांचा जलदान विधी शुक्रवार दि. ५ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता महागाव येथे होणार असल्याचे कांबळे कुटुबियांकडून सांगण्यात आले.

## मुलासह विवाहित तरुणी बेपत्ता

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे येथून एक विवाहित तरुणी आपल्या मुलासह बेपत्ता झाली. चित्रपट पाहण्यासाठी जात आहे, असे सांगून महिला आपल्या चार वर्षाच्या मुलासह १५ मार्च रोजी बाहेर पडली. त्यानंतर संध्याकाळ झाली तरी ती घरी परत न आल्यामुळे तिचा सर्वत्र शोध घेतला. मात्र ती सापडली नसल्यामुळे तिचे पती अजित दत्तात्रेय पाटील यांनी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

त्या महिलेचे वर्णन रंग गोरा, चेहरा गोल, नाक सरळ, मध्यम बांधा, केस काळे व लांब, उंची चार फूट दहा इंच, डोळे काळे, अंगात काळ्या रंगाचा टॉप, निळ्या रंगाची जीन्स, पायात सॅंडल तसेच तिच्या मुलाचे नाव आयांश अजित पाटील (वय ४) रंग गोरा, चेहरा गोल, नाक सरळ, मध्यम बांधा केस काळे व बारीक, उंची तीन फूट सहा इंच, डोळे काळे, अंगात राखाडी रंगाची पॅन्ट व कोकम रंगाचा टी-शर्ट पायात तपकिरी रंगाचे बूट, मराठी बोलतो व समजते असे आहे. याप्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सचिन पाटील हे तपास करीत आहेत. तसेच आपल्याला कुणालाही विवाहित तरुणी मुलासह आढळल्यास उरण पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## रायगड रोप-वेचा 'इमॉस'सोबत करार

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड रोप-वेमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या अधिक सुरक्षिततेसाठी मिलेनियम रोप-वे कंपनीने स्विर्त्झलंडमधील इमॉस कंपनीशीही नुकताच सहकार्याचा करार केला. रायगड किल्ल्यावर रोप-वेची सुविधा पुरविणाऱ्या मिलेनियम रोप-वे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र जोग यांनी याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत दिली.

राजेंद्र जोग म्हणाले, रायगड रोप-वेमधूनगेल्या २८ वर्षांत ३५ लाख प्रवाशांची वाहतूक झाली आहे. रोप-वे रेस्क्यू आणि इव्हॅक्युएशन तंत्रज्ञानामध्ये जगात इमॉस आघाडीवर आहे. ६० हून अधिक देशांत त्यांची सेवा पुरविली जाते. रोप-वे क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून इमॉसबरोबर करार करण्यात आला आहे. त्यांच्या तंत्रज्ञांकडून देखभाल दुरुस्तीबरोबच जागतिक दर्जाचे प्रशिक्षणही मिळणार आहे.

केंद्र सरकारने पर्वतमाला परियोजना हा विकास कार्यक्रम आखला असून, त्याद्वारे देशात आगामी पाच वर्षांत २०० हून अधिक रोप-वे उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी सध्याचे सर्व आणि आगामी रोप-वे प्रकल्पांचे ऑडिट, प्रवासी सुरक्षा, सुरक्षा आणि इव्हॅक्युएशन सिस्टीम आदींवर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. त्यामुळे इमॉसशी करार करण्यात आला आहे, अशी माहिती जोग यांनी दिली. तंत्रज्ञानात होत असलेल्या बदलांचा मागोवा घेऊन रायगड रोप-वेमध्येही बदल होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## नारळाची वाडी येथे एकदिवसीय कार्यशाळा

**। वेणगाव । वार्ताहर ।**

निसर्ग सामाजिक संस्था, कोरो इंडिया आणि तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि. बांद्रा-मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने ''मत्स्य व्यवसायातील रोजगाराच्या संधी'' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा कलम-नारळाची वाडी येथे संपन्न झाली. यावेळी संशोधन केंद्रातील सहभागी शास्त्रज्ञ डॉ. भरत यादव यांनी 'शोभिवंत मत्स्यपालन' या विषयावर, तर जीवशास्त्रज्ञ रविंद्र बोंद्रे यांनी 'जलाशयातील मत्स्य पालन, पिंजऱ्यातील मत्स्यशेती' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करून माहिती दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना निसर्ग सामाजिक संस्थेच्या साचिव सपना रोकडे यांनी केली.



सुत्रसंचलन अध्यक्षा विशाखा वाघचौरे यांनी केली. कार्यक्रमाच्या आयोजक सुनिता काबडी यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांना संविधानाची उद्देशिका भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यशाळेच्या कार्यक्रमास बहुसंख्या महिला उपस्थित होत्या.

## गीतेंच्या विजयासाठी कोंडजाई देवीला साकडे

**। पाली । प्रतिनिधी ।**

शिवसेना ठाकरे गटाकडून माजी खासदार अनंत गीते यांना रायगड लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. गीतेंना निवडून आणण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कंबर कसली असून बुधवारी (दि..२०) सुधागड तालुक्यातील युवासेनेच्या वतीने नागशेत येथील ठाकरे घराण्याची कुलदैवत कोंडजाई देवीला नारळ वाढवण्यात आले. युवासेना माजी जिल्हाप्रमुख सचिन डोबले, युवासेना उपजिल्हा अधिकारी प्रवीण पाटील, विधानसभा अधिकारी किरण पिंपळे, युवा सेना सुधागड तालुकाप्रमुख नंदेश पालांडे यांनी तसेच उपस्थित युवा सैनिकांना कोंडजाई देवीला निवडणुकीतील विजयासाठी साकडे घातले तसेच अनंत गीते भरघोस मतांनी निवडून आल्यानंतर त्यांच्या हस्ते देवीची खणा-नारळाने ओटी भरू व या विभागाचा व देवस्थानाचा विकास करू, असे बोलून कोंडजाई देवीचा जयजयकार केला. गीते यांच्या प्रचारार्थ युवासंपर्क अभियान, गाव भेटी कार्यक्रम सुधागड तालुक्यातही राबवण्यात येत आहे. याप्रसंगी युवासेना नांदगाव विभागाच्या अध्यक्षपदी मयूर जाधव, उपविभाग अध्यक्षपदी नीतेश कोळी, पिंपळोली शाखेच्या प्रमुखपदी संगम कोळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## माणगाव-म्हसळा रस्त्यावर अपघात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव-म्हसळा स्त्यावर नळेफोडी गावाजवळ कारची इंज्याय गाडीला धडक लागून अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात १ जण जखमी झाला आहे. हा अपघात सोमवारी (दि.२५) दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास घडला. माणगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी अक्षय प्रतापराव चरणकर रा. पुणे यांनी त्याच्या ताब्यातील होंडा कार (एमएच-१४-केडब्ल्यू-१४६४) माणगाव बाजूकडे घेऊन जात असताना अतिवेगाने चालवून समोरून येणाऱ्या इंज्याय (एमएच-०४-जीइ-६४५२) या गाडीला समोरून धडक दिल्याने झालेल्या अपघात झाला. या अपघातात अजहर आलम शेख (३८) रा. म्हसळा यांच्या उजव्या पायाला व हाताला तसेच गालाला मार लागून ते गंभीर जखमी झाले आहेत. अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झालेले आहे. या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भजकर हे करीत आहेत.

## आडिवलीमध्ये उल्हास नदीत उत्खनन

### पुर नियंत्रण रेषेचे सर्व नियम धाब्यावर

*। नेरळ । प्रतिनिधी ।*

***खंडाळा घाटात उगम पावलेली उल्हास नदी ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी समजली जाते. या नदीच्या आसपास कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये असे स्पष्ट निर्देश मुंबई हायकोर्टाचे आहेत. मात्र, तरी देखील नदीमध्ये मातीचे उत्खनन आणि नदीमध्ये असलेली बेट नष्ट करण्याचा धडाका आडीवली तमनाथ भागात सुरू आहे. दरम्यान, राजकीय वरदहस्त असलेले तेथील बांधकाम दिवसेंदिवस अधिक वेगाने सुरू असून अधिकारी कागदी घोडे नाचवत आहेत.***

*या नदीच्या परिसरात कोणत्याही प्रकारची बांधकामे होणार नाहीत याची काळजी स्थानिक प्रशासनाने घेण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे*



*निर्देश आहेत. मात्र असे असताना थेट पूर नियंत्रण रेषेमध्ये जावून बांधकाम आणि उत्खनन दररोज सुरू असून राजकीय वरदहस्ताने सुरू असलेले नदी पात्रातील बांधकाम कोण थांबविणार? असा प्रश्न सर्वसामान्य यांना पडला आहे. तमनाथ आणि आडीवली या भागात सुरू असलेल्या बांधकामांमुळे नदीच्या पलीकडे असलेल्या गावांमध्ये पावसाळ्यात पाणी शिरण्याची शक्यता आहे. मोहीली परिसरातील बहुसंख्य भागात पाणी शिरून नुकसान होण्याची शक्यता आहे. या पूर्वी १५० मीटर रुंदीचे नदीचे पात्र आज फक्त ५० मीटर रुंदीवर येवून ठेपले आहे. त्यामुळे पावसाळ्यात खऱ्या अर्थाने नदीच्या पलीकडे असलेल्या भागातील रहिवाश्यांची धावपळ आणि त्यांच्यासाठी रेस्कु करण्याची वेळ प्रशासनावर येणार हे जवळपास नक्की आहे.*

*आता तर नदीच्या पात्रात घुसून संबंधित बांधकाम व्यवसायिक कडून मातीचे उत्खनन करून गाळ काढला जात आहे. त्या परिसरात गेली आठ दिवस प्रोकलेम मशीनचे साहाय्याने नदी मधून माती काढून बांधकाम केलेल्या ठिकाणी भराव टाकला जात आहे. त्यामुळे जुन्या नदी पात्राचे अवशेष मिटवून टाकण्याचा प्रयत्न संबंधित बांधकाम व्यव्रसायिक करीत आहेत. दुसरीकडे गाळ भरलेली माती काढून नदीमध्ये अतिक्रमण करण्याचा डाव संबंधित बांधकाम व्यवसायिक आणि जागा मालक यांचा दिसून येत आहे. त्याचवेळी नदीमध्ये वर्षानुवर्षे असलेले बेट देखील उद्ध्वस्त केली जात आहेत. त्यासाठी अवजड मशीनच्या साहाय्याने ती बेटे नष्ट करून तेथे बोटिंग क्लब उभारण्यासाठी तयारी पूर्ण केली जात आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेली नदीमध्ये प्रदूषण करण्याचा प्रयत्न भविष्यात या ठिकाणी होणार आहे. स्वामित्व शुल्क आणि मार्च अखेर या काळात महसूल विभागाचे तलाठी आणि मंडळ अधिकारी कुठे खोदकाम सुरू आहे, याचा शोध घेत असतात. मात्र, मुख्य रस्त्याच्या कडेला रात्रंदिवस प्रोक्लेम मशीन यांचे सहाय्याने नदी मध्ये घुसून माती काढून अन्य ठिकाणी टाकली जात असताना महसूल विभाग तेथे कारवाई करून आपला महसूल वाढविण्यासाठी आग्रही नाही याचे गणित देखील सर्वसामान्य लोकांच्या कळण्याच्या पलिकडील आहे.*

निवडक

## शिवजन्मोत्सवाचे आयोजन

**चिरनेर :** रांजणपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सोहळा गुरुवारी (दि.२८) साजरा करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिषेक सोहळा, कीर्तन होईल. अध्यात्मिक पौर्णिमा मंडळ चिरनेर भोम यांचे शिष्यगण सहभाग घेतील. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा पाळणा गीत सादर करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येईल, अशी माहिती ग्रामस्थ मंडळ चिरनेर रांजणपाडा चिंचपाडा ग्रामस्थांनी दिली.

## बंगल्यात घरफोडी

**पनवेल :** एका बंद बंगल्यात अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम व परदेशी चलन असा मिळून जवळपास ४ लाखांचा ऐवज चोरीस गेल्याची घटना घडली आहे. नवीन पनवेल येथील प्लॉट नं २२, सेक्टर १२, रोड नं ११ येथील राजेंद्र डोंगरे यांच्या सुनीती या बंद बंगल्यात अज्ञात चोरट्याने खिडकीचे ग्रील तोडून आत प्रवेश करून घरामधील मुद्देमाल लंपास केला आहे. याबाबतची तक्रार खान्देश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

## मराठा समाजाची बैठक

**पनवेल :** सकल मराठा समाज करंजाडे शहराची बैठक पार पडली. नुकत्याच अंतरवाली सराटी येथे झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मावळ मतदारसंघात विनोद साबळे यांना अपक्ष उमेदवार म्हणून मराठा बांधवांनी सहमती दर्शवली आहे. यावेळी चर्चेदरम्यान मराठ्यांचा उमेदवारावर चर्चा होऊन आपला अपक्ष उमेदवार उभा करण्यात सहमती झाली. तसेच आपल्या परिसरातून कोण इच्छुक उमेदवार असु शकते यावर सर्वसाधारण चर्चा होऊन सर्वानुमते विनोद साबळे यांचे नाव सुचित करण्यात आले.

## ज्वेलरी बनविण्याची कार्यशाळा

**पनवेल :** डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाऊंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा नवीन पनवेल येथे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रेया जाधव यांच्या संकल्पनेतून सस्टेनेबल व इको फ्रेंडली पेपर ज्वेलरी बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. वजनाने हलक्या व नाविन्यपूर्ण अशा दीर्घा क्रिएशनच्या दागिन्यांना खूप मागणी आहे. प्राजक्ता दळवींनी विद्यार्थ्यांना बनवता येतील अशा सोप्या ज्वेलरी बनविण्याचे प्रशिक्षण दिले. शिकण्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

## रिंगण सोहळ्याचे आयोजन

**पनवेल :** वाशी येथे साजरा होणाऱ्या श्री गुरू पादुका दर्शन सोहळ्यासाठी गुरूसेवक मोठ्या प्रमाणात दाखल होत आहेत. यानिमित्त रायगड, पनवेल, ठाणे वारकरी संप्रदायातर्फे हरिपाठ आणि रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला होता.पादुका दर्शनासाठी संत ज्ञानेश्वर महाराज, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत जनाबाई, संत नरहरी महाराज, संत सेना महाराज, संत निळोबाराय, श्री रामदास स्वामी, श्री स्वामी समर्थ, श्री साईबाबा, यांच्या पादुकांचा लाभ येथील गुरूसेवकांनी घेतला.

# नाका कामगारांचे जीवन असुरक्षित

### मुलांच्या नशिबीही बिगारीचे काम; इतर सुविधा मिळणे गरजेचे

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिक परिसराने वेढलेला भाग असल्याने या परिसरात नव्याने उभी राहणारी गृहसंकुले, औद्योगिक वसाहत, महाविद्यालये आदी कामांकरिता ठेकेदारांकडे बिगारी कामे निघत आहेत. या कामांकरिता नाका कामगार मोठ्या प्रमाणात मिळत आहेत. त्यांना रोजंदारीचे चांगले आमिषही दाखविले जात आहे. मात्र, त्यांच्या हक्काचे पैसे देण्याची वेळ येते त्यावेळी त्यांना भांडल्याशिवाय ते पैसे मिळत नसल्याचे वास्तव आहे.




बिगारीचे काम करताना बहुमजली इमारतींच्या कामावर जीव धोक्यात घालून लक्ष द्यावे लागते. या नाका कामगारांचे जीवन असुरक्षित असून या कामगारांना शासनाच्या किमान वेतन व इतर सुविधा मिळणे गरजेचे आहे. कामाची हमी नसल्याने मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न देखील भेडसावत असल्याने मुलांच्या नशिबीसुध्दा बिगारी काम असल्याची स्थिती निर्माण झाल्याचे नाका कामगारांचे म्हणणे आहे.

कष्टाच्या, बिगारी कामासाठी कर्नाटक, आंध्र प्रदेश आदी भागातील माणसे काम मिळेल या अपेक्षेने सकाळी साडेसात वाजल्यापासून परिसरातील मोहोपाडा मिनीडोअर थांब्याजवळ तसेच वावेघर नाक्यावर उभे असतात. या नाका कामगारांना दिवसाकाठी ६०० ते ७०० रूपये हजेरी मिळते.

बिगारी ३५० ते ४०० व महिला बिगारीला २५० अशी मजुरी मिळत असल्याने मोहोपाडा व वावेघर नाका सकाळी फुलून गेलेला असतो. येथील नाका कामगारांच्या हाताला काम मिळत असले तरी दाम मात्र भांडून घ्यावे लागत आहे. यामुळे कामगारांना हक्कासाठी झगडावे लागत आहे.

> वेठबिगारी नाका कामगारांच्या पाचवीला पुजला आहे. बांधकाम क्षेत्रात राहून लोकांची घरे उभारणारे हात बेघर असल्याने जमिनीवर झोपड्या उभारुन काही कुटूंबे जीवन जगताना दिसतात. काही ठेकेदार या बिगारीचे काम करणाऱ्या कामगारांना वेठबिगारीप्रमाणे राबवून घेतात.
> – भद्रीनाथ चव्हाण
> कामगार



## पीएनपी शाळेत गुड टच बॅड टचचे धडे

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

पीएनपी शाळा वेश्वी येथील किशोरवयीन मुलींसाठी गुड टच बॅड टच याविषयी डॉ. ॲड. निहा राऊत यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक व माध्यमिक शाळा, वेश्वी गोंधळपाडा येथे अलिबाग पंचायत समिती दहा टक्के सेस अनुदानातून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, अलिबाग व प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्यासंयुक्त विद्यमाने किशोरवयीन मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमात आयोजित करण्यात आला होता. डॉ. ॲड. निहा राऊत यांनी किशोरवयीन मुलींना स्वतःचे संरक्षण कसे करायचे तसेच गुड टच बॅड टच याविषयी अत्यंत सुंदर असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थीनींबरोबर मोकळेपणाने चर्चा केली तसेच विदयार्थीनीने आपली मते व्यक्त करून छान सहभाग घेतला. तसेच संस्थेच्या कार्याला देखील शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी पीएनपी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, तपस्वी गोंधळी, पीएनपी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे आदी कर्मचारी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश मगर यांनी केले, तर आभार रीना म्हात्रे यांनी मानले.

## जयदीप पाटील नौदलातून सेवानिवृत्त

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण या गावातील जयदीप जयवंत पाटील हे भारतीय तट रक्षक दल (इंडियन कोस्ट गार्ड ) मधून सेवानिवृत्त झाले. पाटील यांनी ३८ वर्ष २ महिने देशाची सेवा केली. त्या बद्दल त्यांचा अनेक ठिकाणी सत्कार करण्यात येत आहे.



वाघ्रण गावातून शेकडोच्यावर शिक्षक, २५ पेक्षा जास्त वकील, अनेक डॉक्टर, इंजिनियर या गावाने दिले आहेत. या बरोबरच देशसेवेचे व्रत घेतलेले तरुणही या गावात पहायला मिळतात. पाटील यांच्या घरी वडील शिक्षक असताना त्याचे अनुकरण करण्याऐवजी त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण झाल्यावर देशसेवेचे व्रत घेऊन देशाची सेवा करण्याचे ठरविले. पाटील यांनी पाचवीपर्यंतचे शिक्षण जिवन शिक्षण मंदिर वाघ्रण शाळेत पुर्ण केले. दहावीपर्यंत माध्यमीक विद्या मंदीर फोफेरी. त्यानंतर मुंबईत गौरीदत्त मित्र जुनीयर कॉलेजमधे शिक्षण घेत असताना ते महाराष्ट्र नेव्हल युनीट एनसीसीमध्ये दाखल झाले. तेथे कॅडेट कॅप्टनपर्यत पोहचले. २९ फेब्रुवारी २०२४ ला वयाच्या ५७ व्या वर्षी प्रदीर्घ देशसेवा करून सेवानिवृत्त झाले. त्यांना भारतमातेचे रक्षण करत असताना अनेक मेडल आणि कमंडेशन मिळाली आहेत.

**३८ वर्ष केली देशाची सेवा**

## माथेरानमध्ये रेस्टॉरंटवर कोसळले झाड

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये एका रेस्टॉरंटवर महाकाय झाड कोसळले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून, आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. झाड इतक्या जोरात कोसळले की, क्षणार्धात होत्याच नव्हते झाले. हॉटेल खूप वर्षापूर्वीचे असून माथेरानमधीलपरिचितरेस्टॉरंटमध्येयाचीगणना होते. सायंकाळी नगरपालिकेचे कर्मचारी येऊन झाडाच्या फांद्या काढून रस्ता मोकळा केला. मात्र कोणताही पंचनामा झाला नसल्यामुळे ते झाड तसेच होते. तदनंतर वन विभाग व महसूल विभागाकडून रीतसर पंचनामा करण्यात आला.



## मालमत्ताकर भरायचे चार दिवस शिल्लक

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ताकर भरण्याचे शेवटचे चार दिवस शिल्लक राहीले असून, मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. दरम्यान, बुधवारी (दि.२७) उच्च न्यायालयात खारघर फोरम यांच्यावतीने महापालिकेच्या मालमत्ता कराविरोधात जनहित याचिकेवरती सुनावणी घेण्यात आली. मा. उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती आणि मा.न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्यापुढे झालेल्या सुनावणीमध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताकर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे मालमत्ताधारकांनी मालमत्ताकर भरून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.




मालमत्ताकर भरण्यासाठी ३१ मार्च ही शेवटची तारीख असून, ज्या मालमत्ताधारकांनी आपले मोबाईल नंबर आपल्या खात्याशी कनेक्ट केले नाहीत त्यांनी आपले मोबाईल नंबर अपडेट करून घ्यावे जेणे करून मालमत्ता कराचे बिल प्रत्यक्ष त्याच मालमत्ताधारकाच्या मोबाईलवरती जाईल.

पुढील वर्षाची दोन टक्के शास्ती वाचविण्यासाठी मालमत्ताधारकांनी ३१ मार्चपूर्वी आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह

**। पनवेल । वार्ताहर ।**

परिसरामध्ये एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे वय ४५ ते ५० वर्षे, रंग सावळा, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस काळे पांढरे, चेहरा उभट, अंगाने मध्यम, अंगात नेसुन लाल रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व मळकट काळसर रंगाची फुल पॅन्ट असून त्याची खुरटी दाढी व समोरील दोन दात पडलेले आहेत. सदर इसमाच्या नातेवाईकांचा पोलीस शोध घेत आहेत. तरी या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक राजरत्न खैरनार यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नायजेरियन नागरिकांना अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघर भागात अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन नायजेरियन नागरिकांना खारघर पोलिसांनी सापळा लावून अटक केली. सन्डे इजेको ओझोगू (४५) व पिटर मुनाचिमसो नॉफो (३५) अशी अटक केलेल्या दोघांची नावे असून त्यांच्याकडून तब्बल ११ लाख ४० हजार रुपये किमतीचे ११४ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन तसेच त्यांची दुचाकी जप्त करण्यात आली.

खारघर सेक्टर २० परिसरात जलवायू विहारच्या पाठिमागे दोन नायजेरियन नागरिक अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतुल आहेर व त्यांच्या पथकाने खारघर सेक्टर-२० मध्ये सापळा लावला होता. या वेळी त्या भागात संशयास्पदरीत्या दुचाकीवरून आलेल्या सन्डे इजेको ओझोगू व पिटर मुनाचिमसो नॉफो या दोन नायजेरियन नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची तपासणी केली असता सन्डे इजेको ओझोगू याच्याजवळ प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ५६ ग्रॅम वजनाचा पाच लाख ६० हजारांचा एमडी सापडला; तर पिटरजवळ प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ५८ ग्रॅम वजनाचा पाच लाख ८० हजारांचा एमडी आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी दोघांकडे सापडलेले तब्बल ११ लाख ४० हजार रुपये किमतीचा एमडी जप्त करून दोघांनाही अटक केली. दरम्यान खारघर येथील टॅक्सी स्टँडजवळ गांजा विक्रीसाठी आलेल्या मोहम्मद रफिक मोहम्मद सईद शेख (५२) याला खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले. खारघर पोलिसांनी रिक्षाची तपासणी केली असता, रिक्षाच्या ड्रायव्हर सीटखाली २ एका पिशवीमध्ये ३० हजार रुपये किमतीचा गांजा आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी गांजासह त्याची रिक्षा जप्त करून मोहम्मद रफिक याला अटक केली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा- (व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.
- फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही असे दोन 2BHK फ्लॅट्स त्वरीत विकणे आहेत. किंमत- ७३ लाख आणि ८३ लाख. संपर्क : ८६९८६८२१२१ (एजंट क्षमस्व)
- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६
संपर्क - ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- चेंढरे अलिबाग येथे बंगला with Terrace भाड्याने देणे आहे. बंगला १००० चौरस फूट. मागे २००० चौरस फूट लॉन, नारळाची झाडे. इच्छुक भाडेकरूंनी संपर्क साधावा ९८६७२१४६१६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## तळा येथे मतदान जनजागृतीचे आयोजन



**। तळा । वार्ताहर ।**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जास्तीत जास्त लोकांनी नैतिकदृष्ट्या मतदान करण्यास प्रवृत्त व्हावे यासाठी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून देश पातळीवर स्वीप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वीप पथकाच्या (दि.२७) तळा परिसरात मतदार जनजागृती रॅलीच्या आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी तळा तहसीलदार स्वाती पाटील, नोडल अधिकारी दिपाली शेळके यांनी या स्वीप पथकाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. राजाराम थोरात, डॉ. दिवाकर कदम, प्रा. नितीन पाटील, प्रा. धोंडीबा आंबेगावे, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार जितेंद्र टेंबे, चंद्रकांत राऊत, किशोर मालुसरे, भारत जाधव, अनिल घोडे, रवी बावदाने, प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## अमर भंडारी यांचा प्रामाणिकपणा

### सापडलेले सोन्याचे जोड केले परत

**। नागोठणे । वार्ताहर ।**

आज माणुसकी लोप पावत असल्याची ओरड सर्वत्र ऐकायला मिळत आहे. असे असतांनाच काही व्यक्ती आपल्या कृतीमधूनच माणुसकी जिवंत असल्याचे दाखवून देत आहेत. असाच काहिसा प्रकार नागोठण्यात घडला असून आपल्या प्रामाणिकपणातून हा माणुसकीचा ओलावा जिवंत असल्याचे नागोठणे बाजारपेठेतील अमर अशोक भंडारे यांनी त्यांना सापडलेले सोन्याचे जोड परत करुन दाखवून दिले आहे.



पोलीसाच्या माहितीनुसार नागोठणे बाजारपेठेत कटलरी सामानाचे दुकान असलेले छोटे व्यापारी अमर भंडारे रा. गवळ आळी हे बाजारपेठेतील किराणा दुकानदार व्यापारी संतोष कावेडिया जैन यांचे दुकानाबाहेर कटलरीचे दुकान आहे. त्यांना शनिवारी (दि. २३) दुकानांमध्ये खरेदीकरीता आलेल्याएका मुलीचे सोन्याचे कानातील जोड मिळून आले. सोन्याचे कानातील जोड अमर भंडारे यांनी प्रामाणिकपणे नागोठणे पोलिस ठाण्यात आणून दिले. सोन्याचे कानातील जोड हरविलेली मुलगी मनिषा गुप्ता हिचा भाऊ आकाश गुप्ता हा पोलिस ठाण्यात सोन्याचे जोड हरविल्याची माहिती देण्यास पोलीस ठाण्यात आला. त्यावेळी सोन्याच्या जोडांची ओळख पटविण्यात आली. भंडारे यांना दि. २६ मार्च रोजी नागोठणे पोलीस ठाण्यात बोलविण्यात आले. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि. हरेश काळसेकर यांच्या उपस्थितीत आकाश गुप्ता यांना परत देण्यात आले आहेत.

### कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी शासन परिपत्रक जारी

# मतदानाच्या दिवशी मिळणार भरपगारी सुट्टी

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**राज्यातील लोकसभा मतदारसंघात पाच टप्प्यांत मतदान होणार आहे. या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. याबाबतचे शासन परिपत्रक राज्य शासनाने जारी केले आहे.**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्यात या निवडणुकीचे मतदान १९ एप्रिल, २६ एप्रिल, ०७ मे, १३ मे आणि २० मे २०२४ अशा पाच टप्प्यात होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. यामध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी परिपत्रक जारी करण्यात आले आहे.



या आदेशानुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही, त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे.

मात्र, त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहणार आहे. उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम आदींच्या आस्थापनांना या सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी लागणार आहे. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येणार आहे, अशी सूचनाही या आदेशाद्वारे देण्यात आली आहे.

## निवडक

### पर्थवर रंगणार पहिला सामना

**मेलबर्न :** भारत- ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये २२ नोव्हेंबरपासून पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होणार असून, दोन देशांमधील पहिला कसोटी सामना पर्थ येथे रंगणार आहे. ऑस्ट्रेलियातील क्रिकेट मोसमाची सुरुवात दरवर्षी ॲडलेड येथील कसोटीने केली जाते. मात्र; या वर्षी पर्थ येथे कसोटी मालिकेचा श्रीगणेशा होणार आहे. ऑस्ट्रेलियन संघातील क्रिकेटपटूंच्या सल्ल्यानुसार क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून वेळापत्रक तयार करताना पर्थ या स्थळाला प्राधान्य देण्यात आले.

### फिफाचे स्वप्न भंगले

**नवी दिल्ली :** भारतीय फुटबॉल संघाला मंगळवारी घरच्या मैदानावर पराभवाचा सामना करावा लागला. भारतीय संघावर २-१ असा विजय मिळवला. या पराभवामुळे भारताच्या फिफा विश्वकरंडक आशियाई पात्रता पुढील फेरीत पोहोचण्याच्या आशांना सुरुंग लागला आहे. भारतीय संघाने उत्तरार्धातही आघाडी कायम ठेवण्याचा प्रयत्न केला; मात्र ७० व्या मिनिटाला रहमत अकबारी याने अफगाणसाठी अफलातून गोल करीत त्यांना बरोबरी साधून दिली.

### आफ्रिदीचे कर्णधारपद धोक्यात

**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेटमध्ये बदल सातत्याने दिसून येत आहेत. जूनमध्ये होणाऱ्या टी-२० वर्ल्डकपपूर्वी संघाच्या कर्णधारपदात मोठा बदल होऊ शकतो. बाबरने कर्णधारपद सोडून चार महिनेही उलटले नाहीत आणि पीसीबी त्याला तिन्ही फॉरमॅटमध्ये पुन्हा कर्णधार बनविण्याच्या विचारात आहे. शान मसूद आणि शाहीन शाह आफ्रिदी संघाचे नेतृत्व करण्याच्या क्षमतेवर पीसीबीचा विश्वास उडाला आहे. त्यामुळे माजी कर्णधार बाबर हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे त्यांना वाटत आहे.

### राष्ट्रीय खेळाडूकडे दुर्लक्ष

**सोलापूर :** महाराष्ट्राच्या मातीतील लोकप्रिय खेळ म्हणजे कुस्ती होय. या जिल्ह्यात अनेक नामवंत मल्ल घडले आणि आताही घडत आहेत. पण उमेदीच्या काळात कुस्तीचे फड गाजवणाऱ्या राष्ट्रीय मल्लावर म्हातारपणी शेळ्या राखून जगण्याची वेळ आली आहे. वाल्मिकी माने असं या ६५ वर्षीय मल्लाचं नाव असून ते मोहोळ तालुक्यातील हराळवाडीचे आहेत. देशपातळीवर जिल्ह्याचे नाव गाजवणारा हा खेळाडू आता हलाखीचे जीवन जगत आहे.

### पुनियाला मंत्रालयाकडून मदत

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिंपिकसाठी अपात्र ठरल्यानंतरही बजरंग पुनिया याला केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून आर्थिक मदत करण्यात आली आहे. तसेच त्याचे वैयक्तिक प्रशिक्षकांचा करार वाढवण्याची त्याची मागणीही मान्य करण्यात आली.केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून बजरंग पुनियाचे प्रशिक्षक काझी मुस्तफा यांच्यासोबतचा करार २४ मेपर्यंत वाढवण्याला परवानगी देण्यात आली आहे. दरम्यान, बजरंग पुनिया याने ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती.

## ३३वी किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा; बिंदिसा सोनारकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा

# महाराष्ट्राचा संघ जाहीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशने '३३व्या किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी' स्पर्धेकरीता बुधवारी(दि.२७) आपला संघ जाहीर केला. नाशिक शहरच्या बिंदिसा सोनारकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली. तर सांगलीच्या श्रावणी भोसलेकडे उपसंघनायिकेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.


• संग्रहीत छायाचित्र

यंदा अंतिम विजयी ठरलेल्या जालन्याच्या तीन मुलींचा या संघात समावेश करण्यात आला आहे.

पटणा, बिहार येथील पाटली पुत्र क्रीडा संकुलात ३१ मार्च ते ३ एप्रिल २०२४ या कालावधीत या स्पर्धा होतील.

पुणे येथे नुकत्याच झालेल्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून ४० जणींची किशोरी गटाच्या सराव शिबिरा करीता निवड करण्यात आली आहे.

संघ सराव शिबीर महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएनच्या मान्यतेने अहमदनगर जिल्हा हौशी कबड्डी संघटनेच्या सहकार्याने त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान यांच्या यजमान पदा खाली नेवासा येथे घेण्यात आला.

४० जणींमधून स्पर्धेकरीता १२ जणांचा संघ निवडण्यात आला.

हा निवडण्यात आलेला संघ गुरुवार दिनांक २८मार्च रोजी दुपारी १२-१५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथून समस्तीपुर सुपर फास्ट एक्स्प्रेसने स्पर्धेकरीता रवाना होईल.

संघ शुक्रवारी (दि.२९) सायंकाळी ५-१० च्या सुमारास पाटली पुत्र येथे पोहचेल असे सांगण्यात आले आहे.

सराव शिबीर यशस्वी करण्याकरिता त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे अध्यक्ष साहेबराव घाडगे पाटील, प्राचार्य सोपानराव काळे, प्रसिद्ध उद्योजक संभाजी काळे यांनी अथक परिश्रम घेतले.

**निवडण्यात आलेला संघ** किशोरी गटाचा संघ :- १) बिंदिसा सोनार (संघनायक) नाशिक शहर, २) श्रावणी भोसले(उपसंघनायिका)-सांगली, ३) मोनिका पवार - जालना, ४) राणी भुजंग - जालना, ५) साक्षी जाधव - परभणी, ६)भाग्यश्री गायकवाड - जालना, ७) तनिष्का बोरकर - पिंपरी-चिंचवड, ८) सम ीक्षा पाटील - नंदुरबार, ९) मुग्धा शिर्के - रत्नागिरी, १०) संस्कृती सुतार - सातारा, ११) दृष्टी कुंभार - मुंबई शहर पश्चिम, १२) आरती शेळके - ठाणे.

**प्रशिक्षक :-** ज्ञानेश्वर ठोंबरे - परभणी, सहा.प्रशिक्षक:- अशोक पानकडे - अहमदनगर.

**व्यवस्थापिका:-** सुवर्णा लोखंडे - अहमदनगर.

# आयपीएलच्या वेळापत्रकात बदल

- ७४ सामने खेळवले जाणार
- दहा संघाचा समावेश

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

जगातील सर्वात मोठ्या टी -२० लीगपैकी एक असणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या १७ व्या सिझनला २२ मार्च पासून सुरुवात झाली आहे. लोकसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर होण्यापूर्वी बीसीसीआयने आयपीएल २०२४ च्या २१ सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले होते. मात्र, आता निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्यावर बीसीसीआयने आयपीएल २०२४ च्या संपूर्ण स्पर्धेचे वेळापत्रक २०२४ जाहीर केले आहे.



बीसीसीआयने सोमवारी जाहीर केलेल्या आयपीएल २०२४ च्या नव्या वेळापत्रकानुसार १७ व्या सिझनचा अंतिम सामना २६ मे रोजी चेन्नई येथे खेळवला जाणार आहे. यंदाच्या आयपीएल मध्ये एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. संपूर्ण आयपीएल ही भारतातील विविध शहरात पार पडेल. यंदाही आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपरकिंग्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स, सनरायजर्स हैद्राबाद, लखनऊ सुपर जाएंट्स, गुजरात टायटन्स, पंजाब किंग्स, कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स या १० संघ सहभागी झालेल्या आहेत. आयपीएलच्या दुसऱ्या टप्प्याला ८ एप्रिलपासून सुरुवात होणार आहे. यापूर्वी बीसीसीआयने २२ मार्च ते ७ एप्रिल दरम्यानचे वेळापत्रक जाहीर केले होते.

आयपीएलच्या १७ व्या सिझनचे प्लेऑफ सामने हे अहमदाबाद आणि चेन्नई येथे खेळवले जातील. फायनल आणि क्वालिफायर २ मॅचचे आयोजन चेन्नईतील एम ए चिदंबरम स्टेडियममध्ये करण्यात आले आहे. क्वालिफायर १ आणि एलिमिनेटरचा सामना हा अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये रंगणार आहे.

# क्रिकेटची सुरक्षा वाऱ्यावर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या १७ व्या मोसमातील सहावा सामना सोमवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि पंजाब किंग्स यांच्यात रंगला. हा सामना आरसीबीने ४ विकेटने जिंकला. परंतु या सामन्यात एक घोडचूक झाली. या सामन्यात पंजाब किंग्सने १७७ धावांचे टारगेट आरसीबीला दिले होते. हे टारगेट आरसीबीने सहा गडी गमावून पूर्ण केले. परंतु जेव्हा विराट कोहली फलंदाजी करत होतो, त्यावेळी सुरक्षा व्यवस्थेत एक मोठी चूक झाली. त्याचा व्हिडिओ समोर आला आहे. एक प्रेक्षक सरळ मैदानात घुसला. तो विराट कोहलीजवळ गेला. त्याचे पाय पकडले. त्यानंतर त्याला मिठी मारली. त्यानंतर खेळाडू आणि सुरक्षा रक्षक धावत आले. त्यांनी त्याला पकडून बाहेर काढले.



### कुत्रा घुसला मैदानात

**रविवारी मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स सामन्यात एक कुत्रा मैदानात घुसला होता. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा प्रकार घडला होता. गुजरातची फलंदाजी सुरु असताना १५व्या षटकात हा प्रकार घडला होता. कुत्र्यानेही सर्व सुरक्षा व्यवस्थेला चकवा दिला होता.**

### कोहलीजवळ पोहचला चाहता

**जानेवारी महिन्यात अफगाणिस्तानविरुद्ध सामन्यात असाच काही प्रकार घडला होता. अफगाणिस्तानविरुद्ध दुसऱ्या टी सामन्यात विराट कोहलीचा एक चाहता सरळ मैदानात घुसला होता. त्याने विराटला मिठी मारली होती. त्यावेळी विराट क्षेत्ररक्षण करत होता. आता दुसऱ्यांदा हा प्रकार घडला आहे. यामुळे आयपीएल आणि खेळाडूंच्या सुरक्षेसंदर्भात प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे.**

## कोटियनचे भाग्य उजळले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

यंदाच्या रणजी क्रिकेट स्पर्धेत सर्वोत्तम ठरलेला आणि विजेता मुंबईचा संघ अडचणीत आला तेव्हा मदतीला धावून आलेल्या अष्टपैलू तनुष कोटियनचे भाग्य उजळले आहे. आयपीएलमध्ये ॲडम झाम्पाने माघार घेतल्यामुळे राजस्थान रॉयल्स संघात तनुषची निवड करण्यात आली आहे. त्याला २० लाख पायाभूत किंमत देण्यात आली आहे. गत आयपीएलमध्ये ऑस्ट्रेलियाच्या झाम्पाने आठ सामन्यांतून सहा विकेट मिळवल्या होत्या. त्याला १.५ कोटी रक्कम देऊन संघात कायम ठेवण्यात आले होते.

# होळीचषक स्पर्धेत वैदही इंटरप्राईजेस अंतिम विजेता

**। गोवे-कोलाड । वार्ताहर ।**

श्री सोमजाई प्रसन्न गोवेतर्फे होळी चषक पर्व २ चे आयोजन दि.२४ दि.२५ मार्च रोजी करण्यात आले होते. या रोमहर्षक झालेल्याअंतिम स्पर्धेत वैदही इंटरप्राजेस संघ मालक संदीप जाधव यांचा संघ प्रथम क्रमांकाचा विजयी संघ ठरला. तर ॐ पार्थ इलेव्हन गोवे संघ मालक नितीन जाधव यांचा संघ द्वितीय क्रमांकाचा मानकरी संघ ठरला.



या स्पर्धेत विवेक पवार याला उत्कृष्ट मालिकावीर सायकल व चषक, शुभंम वारकर उत्कृष्ट फालंदाज, विनय दहिंबेकर उत्कृष्ट गोलंदाज, संदीप जाधव उत्कृष्ट यष्टीरक्षक, पांडुरंग जाधव उत्कृष्ट क्षेत्ररक्षण सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले.

यावेळी गावाकमेटी अध्यक्ष नाम देव जाधव, कमलाकर शिर्के, संदीप जाधव, नितीन जाधव, मंदार जाधव, भीमराज कापसे, स्वप्नील सानप, भरत जाधव, शांताराम पवार, मनोहर मांजरे, दिपक जाधव, लीलाधर दहिंबेकर, महेंद्र जाधव, नितीन वारकर, रामचंद्र कापसे, महेंद्र मांजरे, नंदा जाधव, पांडुरंग वारकर, नंदा वाफिलकर, अनंत पवार, रविंद्र जाधव, पांडुरंग जाधव यांच्या सहित असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते. स्पर्धेचे समालोचन निलेश जाधव, अमित घरट, निखिल वाफिलकर यांनी केले. स्पर्धा यशस्वीकरण्यासाठी शरद वारकर, ललित जाधव, राजेंद्र जाधव, कल्पेश सुर्वे, संघ मालक सर्व मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांनी मेहनत घेतली.

# गिलवर दंडात्मक कारवाई

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सने आयपीएलच्या आचार संहितेतील नियमाचा भंग करण्याची ही १७ व्या आयपीएल हंगामातील पहिलीच वेळ आहे. त्यामुळे गिलवर कर्णधार म्हणून १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे.नियमानुसार ९० मिनिटांच्या आत संघाला २० षटके पूर्ण करावी लागतात. षटकांची गती कमी राखल्याची चूक पहिल्यांदा झाल्यास कर्णधारावर १२ लाखांचा दंड ठोठावला जातो.तसेच दुसऱ्यांदा अशी चूक झाल्यास कर्णधारावर २४ लाखांचा दंड आणि प्लेइंग इलेव्हनमधील इतक खेळाडूंवर सहा लाख किंवा सामना



शुल्काच्या २५ टक्के, जी रक्कम कमी असेल, तो दंड ठोठावण्यात येतो. हीच चूक तिसऱ्यांदा झाली, तर कर्णधाराला ३० लाखांचा दंड आणि एका सामन्याची बंदी अशी कारवाई केली जाते.

याशिवाय संघातील खेळाडूंवर १२ लाखांचा किंवा सामना शुल्काच्या ५० टक्के, जी रक्कम कमी असेल, तो दंज ठोठावला जातो. यापुढील होणाऱ्या चुकीसाठी हीच कारवाई कायम केली जाते.

## सीएसके गुणतालिकेत अव्वल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ च्या सातव्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज संघाने गुजरात टायटन्स संघावर ६३ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह सीएसकेने पॉईंट टेबलमध्ये मोठी झेप घेतली आहे. नेट रन रेटमध्ये भरघोस फायदा झाला आहे. पॉईंट टेबलमध्ये चार गुणांसह सीएसकेने पहिले स्थान मिळवले आहे. सीएसकेने मिळवलेल्या मोठ्या विजयामुळे नेट रनरेट +१.९७९ झाला आहे. तर गुजरात टायटन्स संघाचा नेट रनरेट -१.४२५ झाला असून सहाव्या क्रमांकावर संघाची घसरण झाली आहे.

# भारतीय पथकाचा शरथ कमल ध्वजवाहक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑलिम्पिकचे वर्ष आहे. यंदा पॅरिसमध्ये जुलै महिन्याच्या अखेरीस ऑलिम्पिकला सुरुवात होणार आहे. या मोठ्या स्पर्धेसाठी भारताचा दिग्गज टेबल टेनिसपटू शरथ कमल याला ध्वजधारक बनण्याचा मान देण्यात आला आहे.



ऑलिम्पिक २०२४ साठी भारतीय पथकाचा ध्वजधारक म्हणून नेमण्यात आले. ऑलिम्पिक पदक विजेची बॉक्सर मेरी कोम हिला प्रमुख बनवण्यात आले आहे. इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनने माहिती दिली आहे. दरम्यान, ऑलिम्पियन शिवा केशवन यांना उपप्रमुखपद देण्यात आले आहे. याबद्दल इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनने म्हटले आहे की मखेळासाठी मेरी कोमने दिलेले अतुलनीय समर्पणामुळेच तिची निवड ऑलिम्पिकमध्ये खेळाडूंना मार्गदर्शन करण्यासाठी करण्यात आली आहे.

ऑलिम्पिक पदक विजेता गगन नारंग शुटिंग रेंजमध्ये भारताचे व्यवस्थापन पाहिले. शुटिंग रेंज स्पर्धेच्या मुख्य ठिकाणापासून बरेच लांब आहे. नेमबाजीत १९ कोटा भारताने आत्तापर्यंत मिळवले आहेत.

# भारताचा क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी संघ जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बेलग्राडे (सर्बिया) येथे ३० मार्च रोजी होणाऱ्या प्रतिष्ठेच्या जागतिक क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशनने सहा सदस्यांचा भारतीय संघ जाहीर केला. या संघात आशियाई स्पर्धेतील पदक विजेते तसेच राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्यांचा समावेश आहे.

पुरुषांच्या संघात आशियाई स्पर्धेतील रौप्यपदक विजेता कार्तिक कुमार आणि ब्राँझविजेत्या गुलवीर सिंग यांच्यासह राष्ट्रीय स्पर्धा गाजवणाऱ्या हेमराज गुज्जर, गुलवीर सिंग यांचाही समावेश आहे. गुलवीर सिंगने नुकताच १० हजार मीटरमध्ये १६ वर्षांचा राष्ट्रीय विक्रम मोडलेला आहे.



त्याने २७.४१.८१ हा जुना विक्रम २० सेकंदाने मोडला. सुरेंद्रसिंग याने २००८ मध्ये हा विक्रम केला होता; परंतु त्याची ही कामगिरी पॅरिस ऑलिंपिकसाठी पात्र ठरण्यास पुरेशी ठरली नाही. २७.००.०० ही ऑलिंपिक पात्रता वेळ आहे. पुरुषांच्या या संघासह महिला राष्ट्रीय विजेती अंकिता, सीमा आणि अंजली कुमारी यांचा समावेश आहे.


# भारतासाठी उत्कृष्ट फिनिशर | शिवमकडे निवड समितीचे लक्ष

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतात सध्या आयपीएल २०२४ चा थरार सुरू आहे. यानंतर १ जूनपासून होणाऱ्या टी-२० विश्व चषक २०२४ वर सर्वांचे लक्ष आहे. कारण आयपीएल या स्पर्धेत उत्तम काम गिरी केल्यास कोणत्याही खेळाडूला विश्व चषकात स्थान मिळू शकते.

सर्व संघाना कोणत्याही परिस्थितीत १ मे पर्यंत वर्ल्ड कपचा संघ जाहीर करायचा आहे. अशा परिस्थितीत पूर्वार्ध म्हणजेच पहिला एक महिना प्रत्येक खेळाडूसाठी खूप महत्वाचा असतो. या हंगामातील पहिल्या पाच सहा सामन्यात भारतीय खेळाडू चांगली कामगिरी करताना दिसत आहे. गेल्या हंगामात तुफानी कामगिरी करत रिंकू सिंगने भारतीय संघात आपली जागा पक्की केली होती. पण आता त्याच्यासारखा दुसरा खेळाडू आयपीएलमध्ये तयार झाला आहे. त्यामुळे त्याची जागेवर धोका निर्माण झाला आहे.

मात्र, शिवम दुबेने असाच फॉर्म सुरू ठेवला तर निवड समितीला त्याच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. रिंकू सिंगशिवाय तो धोकादायक फिनिशरही ठरू शकतो. एवढेच नाही तर तो गोलंदाजीतही करत आहे. त्यामुळे टीम इंडियात त्याचे स्थान निर्माण होऊ शकते. त्यामुळे त्या दृष्टीने शिवम रिंकूसाठी धोका बनू शकतो.



> भारतासाठी एक वनडे आणि २१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळला. आयपीएलमध्ये ३० च्या सरासरीने ११९१ धावा नावावर

त्याने भारतासाठी १ वनडे आणि २१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने देखील खेळले आहेत. २०१९ नंतर तो थेट २०२३ मध्ये संघात परतला. या कालावधीत त्याने कठोर सराव केला. आयपीएलमध्ये ३० च्या सरासरीने आणि १४० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने ५३ सामने खेळल्यानंतर त्याच्या नावावर ११९१ धावा आहेत. त्याने चार विकेट्सही घेतल्या आहेत.

आयर्लंड आणि अफगाणिस्तान मालिकेव्यतिरिक्त तो भारताकडून आशियाई क्रीडा स्पर्धेतही खेळला होता. आयपीएल २०२२ मध्ये शिवमने ११ सामन्यात २८९ धावा केल्या होत्या आणि २०२३ मध्ये शिवमने १६ सामन्यात ४१८ धावा केल्या होत्या. आगामी टी-२० विश्व चषकात तो भारतासाठी उत्कृष्ट फिनिशरची भूमिकाही बजावू शकतो.

## रोहितचा विक्रम

**मुंबई । वृत्तसंस्था ।**

आशिया रोहितने डेक्कन चार्जर्सकडून आयपीएलचे तीन हंगाम खेळल्यानंतर तो २०११ मध्ये मुंबई इंडियन्समध्ये दाखल झाला होता. रोहित हा मुंबई इंडियन्सचा महत्वाचा खेळाडू आहे.

बुधवारी (दि. २७) रोहित एमआयची निळी जर्सी घालून मैदानात उतरणार आहे. तो या फ्रेंचायजीकडून २००वा आयपीएल सामने खेळणार आहे. रोहितच्या उपस्थितीत आणि नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने खूप मोठे यश पाहिले आहे. रोहित खेळाडू म्हणून मुंबई इंडियन्ससोबतच वाढत राहिला.

# आशिया कपचे वेळापत्रक जाहीर

### भारत-पाकिस्तान एका ग्रुपमध्ये

**मुंबई । वृत्तसंस्था ।**

आशिया क्रिकेट काऊंसिलने महिला आशिया कप २०२४ चे वेळापत्रक जाहीर केले आहे. यंदा महिला आशिया कपचे आयोजन हे श्रीलंका येथील डंबुला येतेच होणार आहे. १९ जुलैपासून आशिया कपला सुरुवात होणार असून २८ जुलैला फायनल सामना पार पडेल. महत्वाची गोष्ट म्हणजे, यंदा स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी होणार असून भारत आणि पाकिस्तान यंदा एकाच ग्रुपमध्ये असणार आहेत. आशिया कप २०२४ स्पर्धेच्या ग्रुप 'ए'मध्ये भारत, पाकिस्तान, नेपाळ, यूएई हे संघ आहेत. तर ग्रुप 'ब' मध्ये बांग्लादेश, श्रीलंका, मलेशिया आणि थायलंड हे संघ आहेत. गतवर्षी भारताच्या महिला संघाने आशिया कप २०२३ चे विजेतेपद पटकावले होते. या स्पर्धेत फायनल सामन्यात भारताने बांगलादेशला हरवले होते. आशिया क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शाह यांनी सांगितले, 'एशियाई क्रिकेट परिषद आशिया कप' २०२४ चे आयोजन करून महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी नेहेमीच प्रयत्नशील आहे.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)